दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२७५ रविवार दि.१४ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-275 Sunday, Dt.14 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीड जिल्ह्याचे निष्क्रीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन असून अडचण आणि नसून खोळंबा..?

**अंबाजोगाई / सुनील सिरसाट**

**आंबेजोगाई तहसील कार्यालयात अलीकडच्या आठ–सहा महिन्यांमध्ये अंबाजोगाई तहसीलदार आणि काही निवडक मंडळ अधिकारी–तलाठी यांच्या माध्यमातून झालेला भ्रष्टाचार उघडकीस आल्याने त्या संबंधित केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कारवाईची मागणी केली असता, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.**



## अंबाजोगाई तहसीलदार आणि इतरांवर ८–८ स्मरणपत्र देऊनही कारवाई होत नाही म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांना यात मोठ्या प्रमाणात मलिदा मिळतोय का ? –प्रिया झांबरे

अलीकडच्या वर्षा–दीड वर्षात आंबेजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे आणि त्यांचे निकटवर्तीय असणारे एक–दोन मंडळ अधिकारी आणि तीन–चार तलाठी यांच्या माध्यमातून तहसीलदार यांनी अनेक प्रकरणात गैरमार्गाचा अवलंब करीत आणि वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत अधिकार नसतानाही आणि नाहक अधिकार देऊन बऱ्याच प्रकरणांमध्ये उलथापालथ केलेली आहे. त्यांच्या अनागोंदी कारभारामुळे सर्वसामान्यावर अन्याय तर झालाच आई. परंतु त्या आडून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे आढळून आल्याचे तक्रारदार प्रिया झांबरे यांनी शासन–महसुल प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. याबाबतीत बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे गेल्या वर्षभरापासून वारंवार पाठपुरावा करूनही नाममात्र पत्र व्यवहार सोडता जिल्हाधिकारी महाशयांनी काही एक ठोस पाऊल न उचलल्याने आणि त्याच अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वारंवार अर्ज करून अक्षरशः ८–८ वेळा स्मरण पत्राच्या माध्यमातून तक्रार करून सुद्धा कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने हे प्रकरण दाबण्यासाठी किंवा या प्रकरणाला जाणीवपूर्वक गती न मिळू देण्यासाठी जिल्हाधिकारी महोदय विवेक जॉन्सन यांचे हात सुद्धा या प्रकरणात कशावरून गुंतले नसावेत किंवा कारवाई होऊ नये म्हणून तहसीलदार विलास तरंगे आणि त्यांचे कर्मचारी मिळून त्यांना मोठ्या प्रमाणात मलिद्याचा पुरवठा करत नसतील हे कशावरून..? माझ्या मते तर अंबाजोगाई तहसील कार्यालयातला भ्रष्टाचार खूप मोठा असल्याने आणि त्याचा आकडा ही तितकाच मोठा असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना त्याचपटीत मलीद्याचा पुरवठा झाला असावा असा संशय आता दिवसेंदिवस बळावत असल्यानेच माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने कुठलीही कारवाई होत नसल्याचे चंद्रपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांनी महसूल प्रशासन आणि सरकार विषयी आपली तीव्र नाराजी व्यक्त केली.

नाराजी व्यक्त करताना झांबरे असेही म्हणाल्या की, सरकारला तुकाराम मुंडे साहेबांसारखे अधिकारी नको आहेत. तर भ्रष्टाचारी विलास तरंगे, त्यांचे सहकारी मंडळ अधिकारी– तलाठी यांच्यासारखे भ्रष्ट अधिकारी आणि अशांना पाठीशी घालणारे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सनांसारखे अधिकारी हवे आहेत. हेच विवेक जॉन्सन जे यापूर्वी चंद्रपूर जिल्ह्याचे सी.ई.ओ. होते. तिथेही त्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून ते बदलीने बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून आले आहेत. मग यांसारखे जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी म्हणून हवे आहेत काय..? केवळ नावात विवेक असुन भागत नाही. तर मेंदुत आणि मेंदुतून बाहेर पडणा–या विचारात विवेक असणे गरजेचे आहे. ईथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यातील विवेक पुर्णतः हरवलेला दिसून येतो आहे. केलेल्या तक्रारींचा निपटाराच होणार नसेल, तर अशाने जनतेला कसा न्याय मिळेल आणि मग असे अधिकारी जनतेच्या पैशाची मोठ्या प्रमाणात लूट करून आणि दुसऱ्या बाजूने शासनाच्याही पैशाचा अपहार करून लूट आणि तूट समीकरणासाठी पोसले जात असतील तर सामान्यांनी काय करायचे.... कसे जगायचे...? असाही प्रश्न प्रिया झांबरे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना उपस्थित केला. तेंव्हा प्रसार माध्यमातून आपल्या कामाचे मुल्यमापन होऊन आपल्या कनिष्ठ अधिकारी–कर्मचारी यांच्यामुळे जिल्हाधिकारी पदाला गालबोट लागत असेल तर, आतातरी जिल्ह्याचे प्रमुख म्हणून विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी या नात्याने अंबाजोगाई तहसील कार्यालय प्रकरणात जातीने लक्ष घालून कारवाई करतील हे पाहणे गरजेचे वाटते.

# डॉ.सुनील बोबडेंनी केली वैद्यकीय क्षेत्रात मोठी क्रांती

## सर्जरीला केले 'बायपास', क्रॉनिक टोटल ऑक्लूजन अँजिओप्लास्टी पहिल्यांदाच बीडमध्ये यशस्वी



बीड /प्रतिनिधी

अल्पवधीत बीड जिल्ह्यात ह्दयरोगासाठी नावलौकिक मिळवलेल्या मेडिकेयर हॉस्पिटलमधील डॉ.सुनील बोबडे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती केली आहे.क्रॉनिक टोटल ऑक्लूजन (हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी धमन्यांपैकी एक धमनी ३ महिने किंवा त्याहून अधिक काळासाठी पूर्णपणे १०० टक्के ब्लॉक असते.) अशी अँजिओप्लास्टी पहिल्यांदाच बीडमध्ये यशस्वी केली आहे.

हृदयरोगतज्ञ डॉ.सुनील बोबडे यांनी बीडमध्ये अतिशय दुर्मिळ आणि गंभीर असलेल्या रुग्णावर केलेल्या या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेमुळे त्या रुग्णाला तर जीवदान मिळालेच पण हृदयाचे आजार असलेल्या रुग्णांसाठी देखील ही शस्त्रक्रिया दिलासा आणि आशेची किरण ठरणार आहे.पांडुरंग गमे (वय–४९) असे रुग्णाचे नाव असून ते मागील

पान २ वर...

### सर्जरीला केले 'बायपास'...

- रुग्ण पांडुरंग गमे यांना गेल्या काही काळापासून छातीत दुखणे आणि श्वास घेण्यास त्रास होत होता. तपासणीअंती त्यांच्या हृदयाची मुख्य रक्तवाहिनी १००% पूर्णपणे बंद असल्याचे समोर आले. अशा रुग्णांवर सहसा बायपास सर्जरी करण्याचा सल्ला दिला जातो, कारण १००% बंद असलेली रक्तवाहिनी अँजिओप्लास्टीद्वारे उघडणे अत्यंत जोखमीचे आणि कौशल्याचे काम असते.मात्र हृदयरोग तज्ज्ञ डॉ.सुनील बोबडे व त्यांच्या टीमने हे आव्हान स्वीकारत अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्याचा वापर करून शरीराची मोठी चिरफाड न करता, केवळ अँजिओप्लास्टीद्वारे ही १००% बंद असलेली रक्तवाहिनी यशस्वीपणे पूर्ववत केली.सध्या रुग्णाची प्रकृती उत्तम असून त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.




बीड दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना दैनिक दिव्य लोकप्रभाचे ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, वादळचे ज्येष्ठ संपादक शेखर कुमार.

# सद्गुरू डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी जंगममठ यांना शिवसंस्कृती रक्षक पुरस्कार जाहीर !

बीड /प्रतिनिधी

प.पू.श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी तसेच प.पू. श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आदेशानुसार श्री जगदुरु विश्वराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने श्री.ष.ब्र. १०८ सदुरु डॉ.विरुपाक्ष शिवाचार्य महाराज जंगममठ संस्थान श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थान यांना शिवसंस्कृती रक्षक या पुरस्काराने आज सोलापूर येथे सन्मानित करण्यात येणार आहे.



श्री जगदुरु विश्वराध्य जनकल्याण प्रतिष्ठान वाराणसी यांच्या वतीने अध्यात्म, संस्कृतसाहित्य ,योग, ध्यान,शिवकथा ई. माध्यमातून समाजप्रबोधन व मानवकल्याण क्षेत्रात मागील ४१ वर्षापासून श्रीपंचाक्षर धर्मजागरण द्वारा श्रावणमास व नवरात्र तपोनुष्टान ,व वेरूळ ,शेगांव व जामखेड दिंडीमाध्यमातून निरपेक्ष भावनेने केलेले देश धर्म संस्कार शिवसंस्कृतिचे संरक्षण संवर्धन महत्कार्य अत्यंत प्रेरणादायी व अभिमानास्पद आहे असे आशिर्वाद छ. संभाजीनगरीतले श्रीसदुरू दमयास्वामी जंगममठ श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थान द्वारा संचालित अप्पावाडी येथील संतशिरोमणी श्रीमन्मथधाम ध्यानमंदिरातील दर्शनालंकार मुर्तीचे अनावरण प्रसंगी श्रीक्षेत्रपंचाक्षर तपोवन येथे श्रीमद्‌काशी जगदुरू महास्वामीजी यांनी व्यक्त केले.

दि ३/६/२०२६ रोज बुधवारी ग्रंथदिंडीचे भव्यरथोत्सवमिरवणुक व दर्शन आशिर्वाद सोहळ्यात जमलेले पंचक्रोशीतले भक्तसमूहातले धर्मसभेतच शाल श्रीफळा देवून या ग्रामीणभागात ही सनातन वीरशैव संस्कृतिचे संस्कार संवर्धन व संरक्षणा करीत करीत असलेले हे कार्य अत्यंत आनंददायी आहे असे शुभाशिर्वाद दिले.

आज दिनांक १४ जुन २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री जगदुरु पांचाचार्यांच्या दिव्य सानिध्यात बृहन्मठ होटगी, अक्कलकोट रोड, वीरतपस्वी मंदिर सोलापूर येथे संपन्न होणार्या कार्यक्रमात श्री गुरु डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज जंगममठ श्रीक्षेत्रमन्मथधाम संस्थान यांना शिवसंस्कृती रक्षक हा पुरस्कार प्रदान केल्या जाणार आहे.

ष ब्र .१०८ श्री सदुरू डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज जंगममठ श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थान यांना या आधी लिं. केदार १००८ श्री श्री श्री सिद्देश्वरलिंग शिवाचार्य महास्वामीजी

वर्ष २००३ ते २००७ मधे

पान २ वर...



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीची तपपूर्ती निमित्त

# ना. पंकजाताई मुंडेंनी सोमनाथ, द्वारकेसह प्रसिध्द धार्मिक स्थळांचे दर्शन घेत महा आरती, वृक्षारोपणही केले..!

मुंबई प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या यशस्वी कारकिर्दीला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी द्वारका, सोमनाथ ज्योतिर्लिंगासह विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन दर्शन घेतले. याठिकाणी त्यांनी महा आरती केली आणि वृक्षारोपणही केले. पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी त्यांनी यावेळी प्रार्थनाही केली.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई आणि बहिण माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह ११ ते १३ जून दरम्यान द्वारका, सोमनाथ या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन भगवान श्रीकृष्ण, महादेवाचे दर्शन घेत आईच्या चारधाम यात्रेचा संकल्प पूर्ण केला.

पान २ वर...



# तिहेरी अपघातात 3 जागीच ठार

लातूर : लातूर–नांदेड महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. आयशर ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील पती–पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर या अपघानंतर लगेच अपघात होऊन आणखी एकाचा मृत्यू झाला असून दोघे जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांनाही पाचारण केले, त्यानंतर घटनेचा पंचनामा करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील नांदेड–लातूर महामार्गावर आलगरवाडी पाटीजवळील नांदेड–लातूर महामार्गावर सायंकाळच्या सुमारास भीषण अपघात घडला असून, या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झालाय, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. आलगरवाडी पाटीजवळ नांदेड–लातूर राष्ट्रीय महामार्गावर एका भरधाव आयशर ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील पती–पत्नीचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रकने समोरून येणाऱ्या वॅगनर कारला आयधर ट्रकने धडक दिली. या दुसऱ्या धडकेत कारमधील एकाचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर चाकूरच्या ग्रामीण रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

# शुल्लक कारणावरून पेट्रोल पंप कर्मचाऱ्यास मारहाण, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील अशोककुमार पेट्रोल पंपावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास मारहाण करून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तिघांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची (एनसीआर) नोंद करण्यात आली आहे.

सचिन दत्तात्रय नरसाळे (वय ३३, रा. घाटवाडी, ता. माजलगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. नरसाळे हे गेल्या १५ वर्षांपासून अशोककुमार पेट्रोल पंपावर काम करत आहेत.१० जून रोजी रात्री सुमारे ९.४१ वाजण्याच्या सुमारास अदिल (पूर्ण नाव माहीत नाही) व त्याचे दोन अनोळखी साथीदार दारूच्या नशेत मोटारसायकलवरून पेट्रोल पंपावर आले. पेट्रोल भरण्यासाठी त्यांनी सुरू असलेल्या मशीनचे नॉझल हातात घेतल्याने कर्मचाऱ्याने त्यांना दुसऱ्या बाजूने वाहन आणण्यास सांगितले. याचा राग आल्याने संबंधितांनी सचिन नरसाळे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, भांडण सोडविण्यासाठी आलेले शंकर राधाकिसन तामखने, दत्ता नागदेव पुजबल आणि मोहन शिवाजीराव गायकवाड यांनाही आरोपींनी शिवीगाळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११५ (२), ३५१(२), ३५२ आणि ३ (५) अन्वये एनसीआर क्रमांक ०२७७/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय....

# शेतमालाची बाजारपेठ भाजपच्या ताब्यात!

पणन मंडळाचे संचालक मंडळ बाजारांबाबत केवळ धोरणात्मक निर्णय घेऊ शकत होते. आता पणनमंत्री थेट बाजाराचे अध्यक्ष झाल्यामुळे तिथला कर्मचारीवर्ग, व्यापारी, बाजारातील गाळे, त्याचे वाटप, रोजच्या शेतमाल विक्रीबाबतचे नियमन, नियंत्रण त्यांच्याकडे आले आहे.

लोकांना रोज लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंचे म्हणजेच शेतमाल विक्री आणि खरेदीचे व्यवस्थापन करणाऱ्या बाजार समित्या 'राष्ट्रीय महत्त्वाचे बाजार' (चरीझर्शी ष छ्रींळेपरश्र खर्ीि- ींरपलश-चछख) या योजनेखाली स्वतंत्रपणे नियंत्रित व विकसित करण्याचे धोरण केंद्र सरकारने ठरविले. त्यासाठी त्यांनी एक आदर्श कायदा बनविला व तो राज्य सरकारांना पाठविला.

ज्या बाजारपेठांत वर्षाला ८० हजार मेट्रीक टन उलाढाल होते आणि जिथे किमान दोन राज्यांतून शेतमाल विक्रीसाठी येतो त्या बाजारांचे व्यवस्थापन शेतकऱ्यांमधून निवडल्या जाणाऱ्या संचालक मंडळाकडून न करता ते थेट राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली आणले गेले आहे. महाराष्ट्रात या निकषात १३ बाजारपेठा येतात. या सर्व बाजारपेठा थेट सरकारच्या नियंत्रणाखाली आणत त्याचे अध्यक्षपद पणनमंत्री यांच्याकडे सोपविण्याचे सरकारने ठरविले. त्याची सुरुवात देशातील एक अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी-नवी मुंबई) येथे झाली. पणनमंत्री जयकुमार रावल हे त्याचे अध्यक्ष बनले.आता ते नागपूर या दुसऱ्या महत्त्वाच्या बाजार समितीचे अध्यक्ष होतील. पुढे पुणे, सोलापूर, लातूर हे बाजार त्यांच्या अंकित येतील. सरकारने ठरविले तर सर्व १३ प्रमुख बाजारपेठा भाजपचे मंत्री असलेल्या रावल यांच्या ताब्यात येतील. त्यात हिंगणघाट, कोल्हापूर, सांगली, तासगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना यांचा समावेश आहे. दुसऱ्या अर्थाने इथे शेतमाल विक्रीसाठी आणणारे सर्व शेतकरी थेट त्यांच्या अंकित येतील.आता यात राजकीय अर्थही काढले जातील. कारण शेतमालाची बाजारपेठ हा अत्यंत संवेदनशील विषय असून शेतीच्या समस्यांचे फार मोठे उत्तर येथेच दडले आहे. उन्हा-पावसात राब राबून शेतकरी आपला शेतमाल बाजारपेठेत आणतो. त्याला उत्तम दर मिळाला तर त्याच्या वर्ष-सहा महिन्यांच्या कष्टाचे चीज होते व त्यात तो संसाराचा गाडा हाकतो. इथे मातीमोल भाव मिळाला तर त्याचे संपूर्ण गणित बिघडते हे वेगळे सांगायला नको. हे बिघडलेले गणित राजकीय फेरमांडणी करण्यास भाग पाडते आणि ठराविक कालावधीनंतर शेतकऱ्यांना पॅकेज द्यावे लागते.



# देशसेवेचा महाविक्रम सिद्धीविनायक मंदिरात भाजपची महाआरती..!

माजलगाव प्रतिनिधी

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी भारताचे लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून सर्वाधिक दिवस देशसेवा करण्याचा अभूतपूर्व विक्रम प्रस्थापित केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी गुरुवार, दिनांक ११ जून २०२६ रोजी माजलगाव येथील सिद्धीविनायक कॉलनी, तहसील रोडवरील सिद्धीविनायक मंदिरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने विशेष प्रार्थना व महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील यांनी सहपत्नीक सिद्धीविनायक गणपतीची विधीवत पूजा व महाआरती केली.महापूजेनंतर उपस्थितांशी संवाद साधताना डॉ.प्रशांत पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खंबीर आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे भारताने जागतिक पातळीवर एक नवी ओळख निर्माण केली आहे. सर्वाधिक काळ लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून देशसेवा करण्याचा त्यांचा हा विक्रम प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देश जागतिक महासत्तेकडे जात आहे त्यांच्या हातून अशीच निरंतर देशसेवा घडावी आणि देशाला परमवैभवावर नेण्याचे बळ त्यांना मिळावे, यासाठी विघ्नहर्त्या सिद्धीविनायकाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली. यावेळी भाजपा माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, शहर मंडळ उपाध्यक्ष मा. पंचायत समिती सदस्य अविनाश कांडुरे, भाजपा पात्रूड मंडळ उपाध्यक्ष हरिभाऊ नवले, मा. सरपंच प्रल्हाद दळवी माजलगाव येथील बालरोग तज्ज्ञ डॉ. गणेश पाटील, डॉ. श्रेया पाटील यांच्यासह या धार्मिक सोहळ्याला भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील श्री आर.ए.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९३/२०२६**
आशा भ्र.जालिंदर चव्हाण व इतर वि.निरंक
**(मार्फत-ॲड.एन.एस.पवार, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **जालिंदर पि.काशिनाथ चव्हाण हे दि.२१.०६.२०२५ रोजी लोणी काळभोर ता.हवेली जि.पुणे** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.आशा भ्र.जालिंदर चव्हाण, वय-२६ वर्षे, धंदा-शेती, रा.मोहाचा मळा तांडा, जातेगांव ता.गेवराई जि.बीड, २.शंभु पि.जालिंदर चव्हाण, वय-२ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र.१, ३.तारूबाई भ्र.काशिनाथ चव्हाण वय-७० वर्षे, धंदा-शेती, रा.मोहाचा मळा तांडा ता.गेवराई जि.बीड** यांनी सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | पुणे महानगर परिवहन महामंडळ शंकर सेठ रोड, स्वारगेट पुणे येथील रक्कम | - | रु.७६८४५/- अक्षरी शहाहत्तर हजार आठशे पंचेचाळीस रूपये व त्यावरील व्याज |

वरील रक्कम मिळणे कामी अर्जदार यांना उत्तराशिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जालिंदर काशिनाथ चव्हाण** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२८/०४/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२५/०६/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**कोर्ट. विद्यमान. श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी.**

**रा.मा.क्र.३७२/जन्म मृत्यू नोंद/२०२६-२७**
**मौजे कोठी तह.घनसावंगी**
**जि.जालना**

**-: जाहीरनामा :-**

मौजे कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं. सखाराम बाळाभाऊ तायडे, राह. कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे मुलगा नावे अतुल सखाराम तायडे याचा जन्म दि.३१/०५/२००७ रोजी मौजे कोठी, येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, कोठी, ता.घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना मुलाचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २/६/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी, घानसावंगी**



**कोर्ट. विद्यमान. श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी.**

**रा.मा.क्र.३७३/जन्म मृत्यू नोंद/२०२६-२७**
**मौजे कोठी तह.घनसावंगी**
**जि.जालना**

**-: जाहीरनामा :-**

मौज कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं.चंद्रशेखर साधु गाडेकर, राह. कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे मुलगा नावे ओमकार चंद्रशेखर गाडेकर याचा जन्म दि.०१/०१/२०१० रोजी मौजे कोठी, येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, कोठी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना मुलाचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०२/०८/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी, घानसावंगी**



**टी.सी हरवला आहे**

नाव: कु.कोल्हे यशवंत युवराज या नावाचा १० पास चा टी.सी. दैठण ते गेवराई प्रवासा दरम्यान हरवला आहे .

तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.नं. ९२०९४८२७५३



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७२५ दि.२४.१०.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जावेद खाजा शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जावेद शेख | मुलगा | २७.०८.१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**कोर्ट. विद्यमान. श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी.**

**रा.मा.क्र.३७०/जन्म मृत्यू नोंद/२०२६-२७**
**मौजे कोठी तह.घनसावंगी**
**जि.जालना**

**-: जाहीरनामा :-**

मौजे कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं. रंगनाथ काशीनाथ पांढरे, राह. कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे मुलगी नावे दिशा रंगनाथ पांढरे हिचा जन्म दि.२३/०६/२००७ रोजी मौजे- कोठी, येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, कोठी, ता.घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना मुलीचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २/६/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी, घानसावंगी**



**कोर्ट. विद्यमान. श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी.**

**रा.मा.क्र.३७/जन्म मृत्यू नोंद/२०२६-२७**
**मौजे कोठी तह.घनसावंगी**
**जि.जालना**

**-: जाहीरनामा :-**

मौजे - कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं. संतोष मधुकर कदम, राह. कोठी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे मुलगा नावे माई संतोष कदम हिचा जन्म दि. १८/०६/२००७ रोजी मौजे- कोठी, येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, कोठी, ता. घनसावंगी, जि.जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना मुलीचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०२/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी, घानसावंगी**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,गेवराई यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३३५/२०२६**
कुशीवर्ता भ्र.त्रिबंक मरकड व इतर वि.निरंक
**(मार्फत-ॲड.एस.एल.कदम, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **त्रिबंक आप्पा मरकर, रा.तलवाडा ता.गेवराई जि.बीड हे दि.२२/०२/२०२६ रोजी तलवाडा ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.कुशीवर्ता भ्र.त्रिबंक मरकड, वय-८५ वर्षे, धंदा-शेती, रा.तलवाडा ता.गेवराई जि.बीड, २.आशाबाई भ्र.दिलीप पवार, वय-५५ वर्षे, धंदा-शेती, रा.आंबेवाडी पो.पिंपळवंडी ता.पाटोदा जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **त्रिंबक आप्पा मरकड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१०/०६/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२०/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई


पान १ वरून...

**डॉ.सुनील बोबडेंनी....**

अनेक महिन्यांपासून ह्रदयाच्या आजाराने त्रस्त होते.त्यामुळे त्यांनी मेडिकेयर हॉस्पिटलला भेट देऊन डॉ.सुनील बोबडे यांच्याकडे निदान केले.यावेळी डॉ.बोबडे यांनी रुग्णाच्या तपासण्या केल्यानंतर रुग्णाला क्रॉनिक टोटल ऑक्लुजन ही गंभीर समस्या असल्याचे स्पष्ट झाले.गमे यांना आपल्याला झालेल्या आजाराबाबत माहिती नव्हती,त्यांचे नातेवाईक देखील तणावात होते.कारण बीड जिल्ह्यात अश्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करायच्या झाल्या तर छत्रपती संभाजीनगर किंवा पुणे.मुंबईसारख्या ठिकाणी धाव घ्यावी लागायची.मात्र डॉ.सुनील बोबडे यांनी रुग्ण आणि नातेवाईकांना विश्वास देत अतिशय जोखमीची अशी शस्त्रक्रिया बीडमध्ये पहिल्यांदाच करत वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती केली आहे.क्रॉनिक टोटल ऑक्लूजनवर शस्त्रक्रिया झाल्यामुळे रुग्णाला जीवदान मिळाले असून बीड जिल्ह्यातून डॉ.सुनील बोबडे यांच्या शस्त्रक्रियेबाबत अभिनंदन केले जात आहे.

**सद्गुरू डॉ. विरुपाक्ष...**

अवघ्या चार वर्षात मांजरसुंबा बसस्थानकाचे शेजारी निर्माण झालेला श्री श्रीसद्गुरू दमयास्वामी जंगममठ संस्थानम् उद्घाटन संद्दर्भात ज्ञान तपोरत्नं

असा पुरस्कार श्रीकेदार जगद्गुरू महासवामीजीनी प्रदान केला होता हे येथे स्वाभीमानाने सुखदस्मरण करावे असे वाटते कारण,दि २०२२ ते २०२५ अवघे चार वर्षपूर्ण होताच २०२६ मध्ये श्रीक्षेत्र पंचाक्षर तपोवन येथे श्रीमद्काशी ज्येष्ठ जगद्गुरू आपले अमृतहस्ते श्रींचे दर्शनालंकार म्रुती अनावरण करून करीत असलेले महाराजांचे हे गौरव त्यांचे शिष्यांना व त्यांना मानणाऱ्या सद्भक्तांना अधिकमासाचा फारमोठा आनंदोत्सव आहे.या आदि ही असाच आनंदोत्सव श्रीमद् रंभापूरी १००८ जगद्गुरू डा.सोमेश्वर राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या लक्ष्मेश्वर दसरा दरबार समारंभात शिवाचार्यरत्न, ही मानद उपाधि देवून दिलेल्या मंगलाशिर्वादानेच

हे सर्व धर्म देश व संस्कृति चे संरक्षण संवर्धन कार्य आपण निरंतर करीत आहात, हे सर्व पुरस्कार प्राप्त करीत आहात,सद्यस्थीतीत सोलापूर येथील अहिल्यबाई होळकर विश्वविद्यालयातील महात्मा श्री बसवेश्वर अध्ययन केंद्रात ही

पान १ वरून...

आपले महत्वपूर्ण योगदान आहे.तसेच कन्नड, मराठी, हिंदी, संस्कृत, तेलगू आणि इंग्रजी भाषेचे जाणकार आहेत. महास्वामीजींनी बनारस हिंदू विश्वविद्यालयालामधून भारतीय दर्शन आणि साहित्यामध्ये डबल एम ए केलेले असून तीन सुवर्णपदकांसह सन्माननीय अशी पीएचडी पदवी प्राप्त केलेली आहे त्यांच्या प्रबंधाचा विषय श्रीनीलकंठ शिवाचार्य विरचितस्य क्रियासारस्य निगमागम मूलकत्त्वंसमीक्षात्मकमध्ययनम् ।असा होता.तथा, अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित असून महाराष्ट्र वीरशैव लिंगायत शिवाचार्य सभेचे राज्यअध्यक्ष, विश्व हिंदू परिषद केंद्रीय मार्गदर्शक, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या श्रीराम जन्मभूमी मंदिरनिर्माण निधीसंग्रह अभियान महाराष्ट्र राज्य सदस्य, प्रमुख मार्गदर्शक, संस्कृतभारती, देवगिरी प्रांत आणि प्रांत मार्गदर्शक हिंदू वीरशैव लिंगायत मंच देवगिरी प्रांत श्री पंचाक्षर ज्ञानोदय गुरुकुल कपिलधारचे ते संस्थापक अध्यक्ष अशा काही महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. त्यांचे काही ग्रंथ प्रकाशित झालेले असून धर्मप्रचारकार्यार्थ त्यांनी अखंड भारत भ्रमण केलेले आहे

आपणास २०२६ ला श्रीमद्काशीपिठाचे वतीने शिवसंस्कृती रक्षक हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून विदर्भ देवगिरी पश्चिम महाराष्ट्रातून सर्व शिष्य ,सद्भक्त व सर्व समाजबांधव अभिनंदनकरून आनंदोत्सव साजरा करत आहेत.

**ना. पंकजाताई मुंडेनी...**

या भक्तिमय प्रवासा दरम्यान श्री सोमनाथ ज्योतिर्लिंग येथे अत्यंत भक्तीभावाने दर्शन आणि अभिषेक करण्याचे भाग्य लाभले असल्याचे त्या म्हणाल्या.दिव येथे निसर्गाचा चमत्कार असलेल्या गंगेश्वर महादेवाचे ही त्यांनी दर्शन घेतले.

मोदींच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना..

या दौऱ्यात ना. पंकजाताई मुंडे यांनी विविध प्रसिद्ध अशा धार्मिक स्थळांचे दर्शन घेत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तीनही दिवसाच्या दौऱ्यात भाजपचे स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यांचे सर्व ठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात आष्टीत संविधान बचाव मोर्चा शासनाला इशारा

आष्टी /प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आष्टी येथे गुरुवारी दि.१२जून भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.जय भीम,जय संविधान च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला असून शासनाने उपवर्गीकरणाचा निर्णय मागे न घेतल्यास राज्यव्यापी लोकशाही आंदोलन उभारण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच समिती आष्टी यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून मोर्चाला सुरुवात झाली. गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत मोर्चा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात पोहोचला. यावेळी आयोजित सभेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

सभेला संबोधित करताना परतूर वकील संघाचे सचिव ड. वेडेकर यांनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक एकात्मतेवर उपवर्गीकरणामुळे घाला घातला जाऊ शकतो, अशी भूमिका मांडली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक अन्याय सहन केलेल्या समाजाला संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत एकसंध ओळख दिली असून त्या अधिकाराला धक्का पोहोचविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात शासनाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी न्यायमूर्ती अनंत बदर आयोगाचा




अहवाल सार्वजनिक करावा जातीनिहाय जनगणना करावी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण वाढवावे शासकीय सेवांमधील अनुशेष भरावा तसेच आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कायदा करावा अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

आंदोलकांनी स्पष्ट केले की हा संघर्ष कोणत्याही समाजाविरोधात नसून संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आहे. अनुसूचित जातींमध्ये फूट पाडणारे कोणतेही धोरण लागू करू नये तसेच सामाजिक न्याय,समता आणि बंधुतेच्या तत्त्वांनुसार शासनाने निर्णय घ्यावेत अशी मागणी करण्यात आली.

शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश समोर ठेवून संविधान बचावासाठी हा लढा उभारण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.मोर्चा अत्यंत शांततापूर्ण वातावरणात पार पडला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती परिसरातून निघालेला मोर्चा अंबड पाटी चौफुली येथील अण्णाभाऊ साठे चौकात समाप्त झाला.मोर्चा यशस्वी करण्यासाठी आष्टी पोलीस ठाण्याचे एपीआय गणेश उर्वशी, पीएसआय चाटे, पोलीस कॉन्स्टेबल वाघमारे, शिंदे, चव्हाण, ढाकणे, कावळे, बादाडे आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभल्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

यावेळी अतुल रमेश कांबळे, रोहन वाघामारे, योगेश मधुकर मोरे, उद्धव डोळस, शिवाजी डोळस, गौतम शेळके, अर्जुन सौंदर्य, नितीन मोरे, सुनील मोरे, पोपट मोरे, भगवान कांबळे, संदीप मोरे, प्रकाश डोळस, सनी डोळस, रोहिदास मस्के, प्रल्हाद लाडे, गणेश वैद्य, भारसाकळे, संतोष खरात, विशाल इंगोले यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# बाळराजे पवार यांची कॉर्नर सभा तर यशराज पंडिताची प्रचार फेरी, मतदारांचा मोठा प्रतिसाद

गेवराई / प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या वार्ड क्रमांक अकराच्या उमेदवारांसाठी भाजपा नेते बाळराजे पवार यांनी शुक्रवारी ता.१२ रोजी अचानक नगर येथे कॉर्नर सभा घेतली, तर युवा नेते यशराज पंडित यांनी प्रचार रॅली काढून भाजपाच्या दोन्ही उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. वार्ड क्रमांक अकराच्या मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला असून, विकासाचे मागे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



गेवराई नगर परिषदेच्या वार्ड क्रमांक अकराच्या पोटनिवडणूकी साठी प्रचाराला प्रारंभ झाला असून, २० जून रोजी मतदान होत असलेल्या या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार राहुल जिजा खंडागळे, सायमा आकेफ काझी यांच्या प्रचारार्थ शुक्रवार ता. १२ रोजी सायंकाळी सहा वाजता अचानक नगर येथे कॉर्नर सभा पार पडली. या सभेत बोलताना पवार म्हणाले की, गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात वार्ड क्रमांक अकरा च्या मतदारांची साथ महत्त्वाची गोष्ट आहे. आपले दोन्ही उमेदवार मोठ्या मताने निवडून द्या, तुमच्या समस्या जाणून घेऊन, त्या पोटतिडीकीने सोडविण्यासाठी राहुल जिजा व आकेफ काझी सक्षम उमेदवार दिले आहेत. तुमच्या आशीर्वादाने नगर परिषदेवर आपलीच सत्ता असून, त्या सत्तेचा गोरगरीब समाजातील विविध घटकांना करून द्यायचा आहे. भारतीय जनता पक्ष विकासात कुठेही कमी पडणार नाही. तुम्ही निवडणुकीत आमच्या उमेदवारांना साथ द्या, तुमचे आशीर्वाद रूपी मतदान द्या, असे आवाहन ही बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना केले आहे. तसेच, युवा नेते यशराज पंडित यांनी अचानक नगर, जायकवाडी वसाहत, तय्यब नगर येथील मतदारांच्या भेटी गाठी घेऊन भाजपाचे अधिकृत उमेदवार राहुल जिजा, आकेफ काझी यांना निवडून देण्याचे आवाहन केले. मतदारांनी प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. तसेच, तय्यब नगर येथील भाजपा उमेदवारांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार, युवा नेते यशराज पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष ड. घुंबार्डे , गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, एजाज भाई मेंबर, शेख बाबु भाई, सभापती सय्यद बद्दुशेठ, सभापती शहेदाद भाई, पाशाभाई, शेख मुखीद टेलर, सय्यद इस्माईल वली, सय्यद माजेद, बबलू खराडे, मुनाफ राज, राजू पठाण, शेख रईस, शोयब आत्तार,

संजू पवार, मंन्सूर मामू, शिवाजी गायकवाड, अनिसभाई डांगे, शोयब भाई फिटर, पापाभाई डांगे, राजा पठाण,किशोर शेरकर, किशोर चौरे, शिवाजी काळे, सोमनाथ कानगुडे, शेख मुजीब यांच्यासह मतदारांची उपस्थिती होती.

# निरपेक्ष सेवाभाव, अध्यात्म आणि मानव कल्याणाच्या कार्याचा गौरव

## श्री गुरु नंदिकेश्वर शिवाचार्य महाराजांना सोनपेठ 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर

सोनपेठ/प्रतिनिधी

श्री गुरु नंदिकेश्वर शिवाचार्य महाराजांनी सोनपेठ मठाचा सर्वांगीण विकास घडवून आणत अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेचे प्रभावी केंद्र म्हणून मठाची ओळख निर्माण केली. त्यांच्या या बहुआयामी, लोककल्याणकारी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांना 'तपोरत्नम' पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याने चिंचकर परिवार कळंब, तसेच भक्त परिवार, शिवाचार्य परंपरेतील अनुयायी आणि सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




सोनपेठ मठाचा सर्वांगीण विकास घडवून आणला असून अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेचे प्रभावी केंद्र म्हणून मठाची ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या बहुआयामी, लोककल्याणकारी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांना 'तपोरत्नम' पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याने चिंचकर परिवार कळंब, तसेच भक्त परिवार, शिवाचार्य परंपरेतील अनुयायी आणि सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अध्यात्म,समाजप्रबोधन आणि मानव कल्याणाच्या क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांपासून निरपेक्ष भावनेने कार्य करणारे सोनपेठ येथील पूज्य श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांना प्रतिष्ठेचा 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर झाला आहे.काशीचे जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आणि डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आदेशानुसार श्री जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. आज दि.१४ जून रोजी सायंकाळी ६ -००वाजता सोलापूर येथील वीर तपस्वी मंदिरात जगद्गुरू पंचाचार्य यांच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.सन २००० मध्ये सोनपेठ मठावर विराजमान झाल्यानंतर श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांनी अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.सन २००२ पासून त्यांनी देशातील बारा ज्योतिर्लिंगामध्ये श्रावणमास अनुष्ठानांची परंपरा सुरू केली. त्यानंतर मराठवाड्या तील विविध गावांमध्ये श्रावणमास अनुष्ठानांच्या माध्यमातून अध्यात्मिक जागृतीचे कार्य सुरू आहे

महाराजांच्या मार्गदर्शना खाली दरवर्षी वैदिक बालसंस्कार शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण उपक्रम तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय व्यक्तींचा गौरव करण्यात येतो.देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.

'बेटी बचाव,बेटी पढाव' अभियानांतर्गत १११ मुलींच्या नावे प्रत्येकी ११ हजार रुपयांच्या ठेवी जमा करून त्यांनी स्त्रीशिक्षण आणि महिला सक्षमीकरणा साठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच वैदिक परंपरा जतन करण्यासाठी आणि भावी पिढीसाठी पुरोहित तयार करण्याच्या उद्देशाने वैदिक प्रशिक्षण शिबिरांचेही आयोजन केले जाते.पंचवीस वर्षांच्या कालावधीत अनेक अडचणींवर त्यांनी मात केली आहे.

# ॲडव्होकसी बैठकीतून उमटला निर्धार

## ऊसतोड महिला कामगारांच्या कल्याणासाठी दृढ संकल्प



माजलगाव प्रतिनिधी

ऊसतोड महिला कामगारांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कार्यरत असलेल्या ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य व कल्याणासाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय डव्होकसी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित आणि बोनसुक्रो अनुदानित 'ग्रो प्रकल्पा'अंतर्गत आयोजित या बैठकीत शासकीय व खाजगी वैद्यकीय अधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच एन.एस.एल. साखर कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते.यावेळी उपस्थितांनी ऊसतोड महिला कामगारांना अद्ययावत आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ खऱ्या गरजूंना मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला.

एन.एस.एल. साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ अधिकारी देवाप्पा जोगरे, जी.एम. केनचे डव्होकसी विभाग प्रमुख पारसनाथ जयस्वाल, सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सावित्री घाटोळ, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, फिल्ड को-ऑर्डिनेटर शहाबुद्दीन शेख आणि कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांनी 'ग्रो प्रकल्पा'च्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ऊसतोड महिला कामगारांपर्यंत प्रजनन आरोग्यविषयक सेवा घरपोच पोहोचविणे, अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांपासून त्यांना परावृत्त करणे आणि प्रभावी समुपदेशन करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य प्रकल्पामार्फत होत आहे. या उपक्रमाच्या भविष्यातील वाटचालीसाठी एन.एस.एल. साखर कारखान्याकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.बैठकीदरम्यान उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले.या बैठकीस २५ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तर १५ एन. एस. एल. साखर कारखान्याच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी एफ. पी. ए. आय. मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, डिशनल डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू, डायरेक्टर ग्रो प्रोजेक्ट डॉ. निलेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर शहाबुद्दीन शेख, दिलीप पाटील, किस्किंदा चवरे आणि आकाश गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे स्वागत शहाबुद्दीन शेख यांनी केले, तर प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी मानले.

# पुरुषोत्तमपुरी येथिल दुर्घटनेतील रुग्णांवर

## गुरुमाऊली आयुर्वेद महाविद्यालयाकडून तातडीने उपचार



माजलगाव प्रतिनिधी

अधिकमास निमित्ताने पुरुषोत्मपुरी येथे हजारो नागरिकांची दररोज गर्दी होत आहे त्यानिमित्ताने भाविक भक्तांच्या आरोग्यसेवेसाठी 'गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद हॉस्पिटल व महाविद्यालय, तर्फे तब्बल महिनाभर झाले आरोग्य सेवा देण्याचे व्रत सुरू आहे.

अशातच काळाचा घाव घालणारी एक दुर्घटना घडली नदीपात्रात भाविकांना पैलतीरावर घेऊन जाणारी नाव पलटल्याने नावेतील प्रवासी पाण्यात पडले व त्यांना गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती मिळताच गुरुमाऊली महाविद्यालयाची डॉक्टरची टीम वेळेची गंभीरता लक्षात घेऊन तत्काळ नावेत बसून पैलतीलावर पोहचली व महाविद्यालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश कुलकर्णी आणि वैद्यकीय विद्यार्थी यांनी जखमी रुग्णांवरती तातडीने प्राथमिक उपचार केले.

# घनसावंगी-अंबड धान्य घोटाळ्यावर तहसीलदारांनीच घातले पांघरूण

## जिल्हाधिकाऱ्यांनी कोट्यवधींच्या अफरातफरीची स्वतंत्र चौकशी करावी - मागणी

जालना /प्रतिनिधी

घनसावंगी आणि अंबड तालुक्यातील शासकीय धान्य वितरण व्यवस्थेत मोठा घोटाळा सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.या प्रकरणात संबंधित तहसीलदारांनी आर्थिक व्यवहार करून भ्रष्टाचारावर पांघरूण घातल्याचा खळबळजनक आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य डॉ. रमेश तारगे यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतंत्र समितीमार्फत सखोल चौकशी करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**५० किलोच्या पोत्यात ३९ किलो धान्य, गरीबांच्या हक्कावर डल्ला...**

घनसावंगी तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात धक्कादायक वास्तव समोर आणले आहे. शासनाच्या द्वारपोच योजनेअंतर्गत रेशन दुकानदारांना मिळणाऱ्या ५० किलो वजनाच्या धान्य पोत्यांमध्ये प्रत्यक्षात केवळ ३९ ते ४७ किलो धान्यच निघत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे हजारो क्विंटल धान्याचा हिशोब गायब होत असून यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

**ग्राहक-दुकानदार संघर्ष वाढला, लाभार्थी हक्काच्या धान्यापासून वंचित...**

धान्य कमी प्रमाणात मिळत असल्याने रेशन दुकानदारांना लाभार्थ्यांना पूर्ण धान्य देणे शक्य होत नाही. परिणामी गावागावांत ग्राहक आणि दुकानदारांमध्ये वाद निर्माण होत असून अनेक ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.हक्काचे धान्य न मिळाल्याने गरीब लाभार्थ्यांमध्ये संताप वाढत असून शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होत आहे. यामुळे ऑनलाईन वितरण व्यवहारांवरही परिणाम होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

**शासकीय गोदामात खाजगी दलालांचे साम्राज्य..**

या तक्रारींची पडताळणी करताना गोदामातील धान्य साठा, वजन आणि वितरण प्रक्रियेत गंभीर अनियमितता असल्याचे उघड झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र या गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याऐवजी संबंधित तहसीलदारांनी आर्थिक तडजोड करून प्रकरण दाबल्याचा थेट आरोप डॉ.रमेश तारगे यांनी केला आहे.

दोन्ही तालुक्यांच्या पुरवठा विभागात शासकीय यंत्रणेपेक्षा खाजगी दलाल वसुली बहाद्दर आणि मध्यस्थांचा हस्तक्षेप वाढल्याने प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली असल्याची टीकाही करण्यात आली आहे.

**दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी..**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे पुढील मागण्या केल्या आहेत धान्य घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र विशेष समिती नेमावी.,गोदामातील धान्य तूट, वजनातील तफावत आणि वितरणातील गैरव्यवहारांची सखोल चौकशी करावी.,तहसीलदारांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास फौजदारी गुन्हे दाखल करावेत., गोदामात हस्तक्षेप करणाऱ्या खाजगी दलाल व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.,गरीब लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे संपूर्ण धान्य मिळण्याची हमी द्यावी. अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

### जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका निर्णायक ठरणार..

घनसावंगी-अंबड धान्य वितरणातील कथित घोटाळ्यामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, आता जिल्हाधिकारी या गंभीर आरोपांची दखल घेऊन चौकशीचे आदेश देतात का, तसेच आरोपांच्या केंद्रस्थानी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई होते का याकडे संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# रक्तदाता एक 'सुपरहिरो..'!

## १४ जून, जागतिक रक्तदाता दिन विशेष

कोल्हापूर - आजच्या जगात जिथे 'सुपरहिरो' शोधण्यासाठी आपल्याला सिनेमा किंवा कॉमिक्सचा आधार घ्यावा लागतो, तिथे आपल्या अवतीभवती वावरणारे हे रक्तदाते खरोखरच पडद्यामागचे खरे सुपरहिरो आहेत. त्यांना कोणतीही महाशक्ती किंवा चमचमणारा पोशाख लागत नाही. फक्त 'हाताची बाही वर करून' आणि मनात माणुसकीची भावना ठेवून ते एका अनोळखी व्यक्तीला नवजीवन देतात. जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने अशा या 'सुपरहिरो' ला सलाम..!

मानवी संस्कृतीच्या इतिहासात विज्ञानाने अनेक अशक्य कोटीतील गोष्टी शक्य करून दाखवल्या. मात्र, एवढी प्रगती करूनही प्रयोगशाळेत कृत्रिम रक्ताचा एक थेंबही तयार करणे मानवाला अद्याप जमलेले नाही. म्हणूनच, वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी मानवी प्राणांचे रक्षण करण्यासाठी केवळ आणि केवळ दुसऱ्या मानवाच्या शरीरात वाहणारे रक्तच कामी येऊ शकते. आज आपण जेव्हा जागतिक रक्तदाता दिनाच्या उंबरठ्यावर उभे आहोत, तेव्हा रक्तदानाकडे केवळ एक 'आकस्मिक वैद्यकीय गरज' किंवा 'पुण्याचे काम' म्हणून न पाहता, ती देशातील प्रत्येक सुजाण नागरिकाची 'सिटिझन ड्युटी' म्हणजेच अनिवार्य नागरिक कर्तव्य मानण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत हा दृष्टिकोन आपल्या समाजमनात रुजत नाही, तोपर्यंत आपण आरोग्य क्षेत्रात स्वावलंबी होऊ शकत नाही.

आपल्या देशात दरवर्षी कोट्यवधी युनिट रक्ताची गरज भासते. अपघात, गुंतागुंतीची प्रसूती, कर्करोग, आणि थॅलेसेमिया किंवा हिमोफिलियासारखे अनुवांशिक आजार असलेल्या रुग्णांसाठी रक्त हे जीवनदान ठरते. परंतु, आजही अनेकदा रक्ताच्या एका पिशवीसाठी रुग्णांच्या नातेवाईकांची होणारी धावपळ आणि मनस्ताप आपल्याला पाहायला मिळतो. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याकडे रक्ताची मागणी आणि पुरवठा यात असलेले असंतुलन. हे असंतुलन दूर करण्यासाठी रक्तदान ही केवळ वर्षातून एकदा करायची सामाजिक औपचारिकता किंवा संकटसमयी करायची मदत न राहता, ते आपल्या दैनंदिन जीवनशैलीचे आणि नागरिक कर्तव्याचे अंग बनणे आवश्यक आहे. प्रत्येक सुदृढ व्यक्तीने वर्षातून किमान दोन ते तीन वेळा स्वेच्छेने रक्तदान केले, तर देशातील रक्ताचा तुटवडा कायमचा संपुष्टात येऊ शकतो.

स्वेच्छिक रक्तदानाच्या या चळवळीत आजवर आपले अनेक घटक दुर्लक्षित राहिले आहेत, हे आपण



प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजे. आपल्या देशाची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, परंतु रक्तदानाची शिबिरे आणि जागृती प्रामुख्याने शहरी भागातच जास्त करतो. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये अफाट ऊर्जा आणि सेवाभाव आहे, गरज आहे ती त्यांच्यापर्यंत योग्य माहिती आणि सुरक्षित रक्तदानाची सुविधा पोहोचवण्याची. दुसरीकडे, देशाच्या निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला वर्गाचा रक्तदानात असणारा सहभाग अजूनही अत्यंत नगण्य आहे. महिलांमधील निमिया म्हणजेच रक्ताल्पतेची समस्या आणि रक्तदान केल्याने शरीरात अशक्तपणा येतो हा जुनाट गैरसमज याला कारणीभूत आहे. महिलांचे आरोग्य सुधारणे आणि त्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांना या मोहिमेत अग्रभागी आणणे, हेच या सिटिझन ड्युटीचे पहिले पाऊल असायला हवे. यासाठी शासनाला युवकांनी त्यांच्या हातात असलेल्या मोबाईलच्या मदतीने जनजागृतीसाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे.याच सोबतीने, ओ-नेगेटिव्ह किंवा एबी-नेगेटिव्ह यांसारख्या दुर्मिळ रक्तगटांच्या व्यवस्थापनाचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. अशा दुर्मिळ रक्तगटांच्या रुग्णांना ऐनवेळी रक्ताची गरज भासते, तेव्हा नातेवाईकांची मोठी फरपट होते. यावर मात करण्यासाठी केवळ संकटसमयी धावपळ करण्यापेक्षा, अशा रक्तगटांच्या नागरिकांनी स्वतःहून पुढे येत आपली नोंदणी करणे आणि नियमित रक्तदान करणे गरजेचे आहे. जेव्हा आपण ग्रामीण भाग, महिला आणि दुर्मिळ रक्तगटांच्या दात्यांना एका साखळीत जोडू, तेव्हाच खऱ्या अर्थाने शंभर टक्के स्वेच्छिक रक्तदानाचे राष्ट्रीय उद्दिष्ट आपल्याला साध्य करता येईल. बळजबरीने किंवा बदल्यात रक्त देण्याच्या (रिप्लेसमेंट डोनेशन) पद्धतीकडून स्वेच्छिक आनंदाने दिल्या जाणाऱ्या रक्ताकडे होणारा प्रवास म्हणजेच खऱ्या अर्थाने नागरिक कर्तव्याची पूर्तता होय.

नागरिकांना हे कर्तव्य पार पाडणे अधिक सुलभ आणि पारदर्शक व्हावे यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने तंत्रज्ञानाचा अत्यंत प्रभावी वापर सुरू केला आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत 'ई-रक्तकोश' (श-ठरज्ञींर्धीह) हे केंद्रीय डिजिटल पोर्टल सुरू आहे. हे पोर्टल देशातील सर्व अधिकृत रक्तपेढ्यांना एकाच छताखाली आणणारे एक गतिमान माध्यम आहे. या पोर्टलच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना केवळ एका क्लिकवर आपल्या परिसरातील रक्तपेढ्यांमध्ये कोणत्या रक्ताचा आणि किती साठा उपलब्ध आहे, याची अचूक आणि रिअल-टाइम माहिती मिळते. यामुळे रक्तासाठी दाहीदिशा फिरण्याची रुग्णांच्या नातेवाईकांची सोय होत आहे. तसेच, 'आयुष्मान भारत' डिजिटल मिशनशी हे जोडले गेल्याने रक्तदानाची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुरक्षित आणि पारदर्शक झाली आहे.

या राष्ट्रीय पोर्टलचा वापर करणे अत्यंत सोपे आणि सुटसुटीत आहे. कोणत्याही नागरिकाला गुगल प्ले स्टोअरवरून 'श-ठरज्ञींर्धीह' हे मोबाईल प्लिकेशन डाऊनलोड करता येते किंवा ु.शीरज्ञींज्ञीह.ळप या अधिकृत संकेतस्थळाला भेट देता येते. या पोर्टलवर होम पेजवरच 'ब्लड अवेलेबिलिटी' (रक्ताची उपलब्धता) हा पर्याय मिळतो. त्यावर आपले राज्य, जिल्हा आणि हवा असलेला रक्तगट निवडल्यास, त्या परिसरातील कोणत्या सरकारी किंवा खाजगी रक्तपेढीत किती युनिट रक्त शिल्लक आहे, याची यादी पत्त्यासह आणि फोन नंबरसह समोर येते. याशिवाय, ज्या नागरिकांना रक्तदान करायचे आहे, ते या पोर्टलवर 'डोनर लॉगिन' करून स्वतःची नोंदणी करू शकतात, आपल्या सोयीनुसार जवळच्या रक्तपेढीत वेळ (स्लॉट) आरक्षित करू शकतात आणि नजीकच्या काळात कुठे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे, याची माहितीही मिळवू शकतात. रक्तदान केल्यानंतर मिळणारे डिजिटल प्रमाणपत्रही याच पोर्टलवरून डाऊनलोड करता येते.केंद्रीय व्यवस्थेला पूरक म्हणून महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या (ु.ारहरीलींल.लो) माध्यमातून राज्यस्तरावर स्वतंत्र आणि सक्षम जाळे निर्माण करण्यात आले आहे. राज्यातील सर्व शासकीय जिल्हा रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि नामांकित खाजगी संस्थांच्या रक्तपेढ्या या राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अविरतपणे कार्यरत आहेत. राज्य शासनाने अशा डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर रक्ताची उपलब्धता सुलभ केली आहे. शासकीय संकेतस्थळांवर राज्यातील मान्यताप्राप्त आणि परवानाधारक रक्तपेढ्यांची अद्ययावत यादी उपलब्ध असून, रक्त चढवताना पाळावयाचे सुरक्षेचे कडक नियम व निकष शासनाने बंधनकारक केले आहेत. यामुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या रक्ताची गुणवत्ता आणि सुरक्षितता सर्वोच्च दर्जाची राखली जाते.

शासकीय स्तरावरून उपलब्ध करून देण्यात आलेल्या या डिजिटल सुविधांचा लाभ घेत नागरिकांनी आता स्वतःहून पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. तंत्रज्ञानाने रक्ताचा शोध घेणे सोपे केले असले, तरी रक्तपेढ्यांमधील साठा वाढवणे हे केवळ मानवी इच्छाशक्तीवरच अवलंबून आहे. आजचा तरुण वर्ग डिजिटली अत्यंत सक्रिय आहे, त्यांनी या पोर्टलचा वापर केवळ स्वतःसाठी न करता आपल्या परिसरातील गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून करावा. प्रत्येक सोसायटी, महाविद्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालयाने या शासकीय यंत्रणेशी समन्वय साधून नियमितपणे शिबिरांचे आयोजन केले, तर रक्ताचा तुटवडा हा शब्दच आपल्या शब्दकोशातून पुसला जाईल.

रक्तदान हे केवळ जीवनदान नाही, तर ते समाजाला एका सूत्रात बांधणारे सर्वोच्च राष्ट्रीय कर्तव्य आहे. जात, पात, धर्म आणि प्रांताच्या भिंती ओलांडून जेव्हा एका नागरिकाचे रक्त दुसऱ्या नागरिकाच्या शरीरात वाहते, तेव्हा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे आणि बंधुभावाचे दर्शन घडते. शासकीय यंत्रणा, डिजिटल पोर्टल्स आणि वैद्यकीय सुविधा सज्ज आहेत, आता गरज आहे ती आपल्या मानसिकतेत बदल करण्याची. या जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने, चला आपण सर्वजण मिळून एक प्रतिज्ञा करूया. रक्तदान ही केवळ आपत्कालीन गरज म्हणून न पाहता, ती आपली नियमित 'सिटिझन ड्युटी' मानूया. आपले हे एक पाऊल अनेक कुटुंबांचे हसू परत मिळवून देऊ शकते आणि देशाला आरोग्याच्या दृष्टीने अधिक बलशाली बनवू शकते. देशाचे जबाबदार नागरिक म्हणून या महायज्ञात आपले योगदान नक्की देऊया.

**शब्दांकन...**
**सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

# नेशन बिल्डरगृहिणी !

बीड / छत्रपती संभाजीनगर

कधी काळी मातृसत्ताक राज्य पद्धती असलेल्या आपल्या देशात काळाच्या ओघात पुरूषप्रधान संस्कृतीचा शिरकाव झाला आणि सर्वत्र पुरूषसत्ताक कुटुंब व्यवस्था रूळली आणि रूजली. नंतरच्या काळात स्त्रियांना बरोबरीचा दर्जा राहीला नाही. जगभरात स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आंदोलने करावी लागली.

आपल्या देशात संविधानाने समान हक्क मान्य केला असला तरी आज समान वागणूक हा प्रश्न आहे. सोबत महिला मुक्ती तसेच महिला तसेच महिला सबलीकरण यावर देखील चर्चा होते. या बाबत सर्वोच्च न्यायालयाने एका अपघात विमा प्रकरणात ऐतिहासिक निवाडा दिला आहे तो महत्वाचा आहे. याद्वारे महिलांना गृहिणी न म्हणता राष्ट्र निर्मितीमधील ( छरींळेप ईीळश्रवशी ) एक व्यक्ती म्हणून मान्यता द्यावी असे भाष्य केले आहे.साधारणपणे गृहिणीचे स्थान घराघरात रांधा-वाढा-उष्टी काढा इतपत मानले जाते. ती गृहिणी व्यक्ती म्हूणन जगताना जी विविध नाती जपते आणि त्या निमित्ताने जे कष्ट उपसत असते त्याचे मोल केले जात नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही.

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी असं आपण म्हणतो तर दुसरीकडे मुलगी शिकली प्रगती झालीअसही सांगतो. सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिला त्याचा संदर्भ अपघात विमा दाव्याशी संदर्भ ठेवून आहे. घरातील एखादा कर्ता पुरूष



अपघातात मरण पावला तर त्याचं वय, कमाई आणि अपेक्षित जीवनमान याच्या आधारे भरपाईची रक्कम ठरविली जाते.

अपघातात मरण पावलेली माहिला कमावती नसेल आणि ती केवळ गृहिणी असेल तर भरपाईचे मोजमापच नाही. म्हणूनच हा निवाडा महत्वाचा आहे.

घरात असणारी सर्व प्रकारची कामे, तसेच मुलांचे संगोपन, शिक्षण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्कार देण्यात गृहिणीचा मोठा वाटा असतो. पुरूषाने फक्त नोकरी-व्यवसाय करुन कुटूंबाच्या निर्वाहासाठी पैसा कमावणं इतकच आपला समाज मानतो. घरातील या कामांसाठी महिलांना पत्नी म्हणून पगार देणारा पती हा प्रकार आपल्याकडे नाही. त्यामुळे गृहिणी म्हणून ती व्यक्ती, ती स्त्री, आपल सर्वस्व झोकून देऊन नवी पिढी घडवत असते. प्रसंगी स्वत: उपाशी राहून मुलांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करते. या अर्थाने ती नवी पिढी घडविण्याचे राष्ट्रीय कार्य करते. म्हणून तीला 'नेशन बिल्डर' चा दर्जा असावा असे निरीक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले असावे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

आपण जर आपल्या आयुष्यात जरा वळून बघितल तर जानवेल की ती गृहिणी म्हणून घरात वावरताना पत्नी, सून, आई, या विविध नात्यांची गुंफण जपत स्वत:ची पर्वा न करता आणि कोणत्याही आभाराची अपेक्षा न करता राबते आणि अगदी घरातील व्यक्ती म्हणून वावरताना ती सतत टोमणे सहन करीत असते. मुलं देखील हॉटेलमध्ये ऑर्डर द्यावी तशी खाण्यासाठी ऑर्डर सोडतात. हे घराघरातलं चित्र आहे. नाही म्हणायला तिचा मोठेपणा मिरवायला हल्ली ग्रिटींग कार्ड, केक आणि पार्टीच्या माध्यमातून 'मदर्स डे' साजरा केला जातो.घरातील स्त्रिया माता म्हणून मिळणारा मान वगळता इतर बाबतीत तिचं आणि तिच्या कामाचं महत्व दुर्लक्षित होत. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीवर सर्व अवलंबून असतात असे नव्हे तर कुटुंबातील कमावत्या सदस्यासोबतच सारं कुटुंब तिच्यावर अवलंबून असतं म्हणून ती 'नेशन बिल्डर'.'मातृ देवो भव' म्हणायचं, सण, उत्सवात दुर्गा व इतर देवींची पुजा करतो मात्र घरातलं दैवत वंचित राहतं. न्यायालयाच्या या निर्णयानं या निमित्तानं एक नवा विचार समोर आणला आहे आणि त्रृशाप न सह सर्वांनाच तो मान्य असावा.

शब्दांकन...

**प्रशांत दैठणकर**

उपसंचालक, छत्रपती संभाजी नगर
तथा जिल्हा माहिती अधिकारी, बीड
९८२३१९९४६६



## मृत्यूनंतरही जग पाहण्याचा अधिकार देणारे नेत्रदान हीच खरी मानवसेवा

### आदित्य कृषी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती व्याख्यानात १० विद्यार्थ्यांनी केला नेत्रदानाचा संकल्प

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) संलग्नित, आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभागाच्या वतीने 'नेत्रदान श्रेष्ठ दान' या विषयावर जनजागृती व्याख्यान उत्साहात पार पडले. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करत अंधत्व निर्मूलनासाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. व्याख्यानातून प्रेरणा घेत १० विद्यार्थ्यांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करत आपले संमती फॉर्म भरून दिले. यावेळी २०५ विद्यार्थी उपस्थित होते.

मृत्यूनंतरही दुसऱ्या व्यक्तीला हे सुंदर जग पाहण्याचा अधिकार मिळवून देणारे 'नेत्रदान' हीच खरी मानवसेवा असल्याचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी म्हणाले.आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवले जात आहेत. आदित्य कृषी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रा.श्याम भुतडा यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. समाजात नेत्रदानाविषयी अजूनही मोठ्या प्रमाणावर उदासीनता आहे, ती दूर करण्यासाठी युवा पिढीमध्ये अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांची अत्यंत गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

१० विद्यार्थ्यांचा जागेवरच संकल्प, फॉर्म भरून दिले..!

या व्याख्यानाने प्रेरित होऊन महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी तत्काळ नेत्रदान करण्याचा संकल्प करत आपले फॉर्म भरून दिले. त्यांच्या या धाडसी व सामाजिक निर्णयाबद्दल महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमात महाविद्यालयातील एकूण २०५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

हा उपक्रम वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. आर. पी. कदम तसेच क्रीडा अधिकारी प्रा. संघर्ष शृंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. श्रद्धा एडके, डॉ. धनंजय सातपुते, डॉ. निर्मला ठोके, प्रा. वैशाली मिसाळ, डॉ. रामप्रसाद मोरे, डॉ. प्रसाद खेडकर, डॉ. ब्रह्मदेव मुंडे, प्रा. प्रिया गव्हाणे, प्रा. शितल बोराडकर, प्रा. युवराज धावणे, प्रा. राऊत यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नंदिग्राम एक्सप्रेस पुन्हा नागपूरपर्यंत सुरू करण्याची मागणी; किनवट-माहूर परिसरातील प्रवाशांमध्ये नाराजी

किनवट : बल्लारशाह ते मुंबई दरम्यान धावणारी गाडी क्रमांक ११००१/११००२ नंदिग्राम एक्सप्रेस ही आदिलाबाद, किनवट, माहूर, बोधडी, इस्लापूर, हिमायतनगर, भोकर, हदगाव तसेच नांदेड जिल्ह्यातील प्रवाशांसाठी मुंबईशी जोडणारी अत्यंत महत्त्वाची रेल्वे सेवा म्हणून ओळखली जाते. मात्र, या गाडीचा विस्तार बल्लारशाहपर्यंत करण्यात आल्यानंतर किनवट व परिसरातील प्रवाशांना आरक्षण मिळविण्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून गाडी पूर्ववत नागपूरपर्यंत चालविण्याची मागणी जोर धरत आहे. नंदिग्राम एक्सप्रेसची सुरुवात नांदेड-मुंबई मार्गावर झाली होती. त्यानंतर काही काळ ही गाडी निजामाबाद-मुंबई दरम्यान चालविण्यात आली. पुढे सुमारे दशकभर ही सेवा नागपूर-मुंबई मार्गावर सुरू होती. कोरोना काळात रेल्वे सेवा बंद झाल्यानंतर पुन्हा सुरू झालेल्या महत्त्वाच्या गाड्यांमध्ये नंदिग्राम एक्सप्रेसचाही समावेश होता. त्या काळात ही गाडी आदिलाबाद-मुंबई दरम्यान सुमारे तीन वर्षे चालविण्यात आली.

यानंतर चंद्रपूरचे माजी खासदार हंसराज अहिर यांच्या पाठपुराव्यामुळे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील प्रवाशांची गरज लक्षात घेऊन या गाडीचा विस्तार बल्लारशाहपर्यंत करण्यात आला. विस्तारानंतर गाडीतील प्रवासीसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी, आदिलाबाद, किनवट, माहूर, हिमायतनगर, हदगाव आणि भोकर, सह उमरखेड तालुक्यातील प्रवाशांना आरक्षण मिळविणे कठीण झाले आहे. गाडी बल्लारशाहहूनच मोठ्या प्रमाणात भरून येत असल्याने या भागातील प्रवाशांना अनेकदा प्रतीक्षा यादीवर अवलंबून राहावे लागत आहे.

विशेष म्हणजे, नांदेड जिल्ह्यातील किनवट हा तालुका जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १९५ किलोमीटर रेल्वे अंतरावर असून रेल्वे प्रवासासाठी नंदिग्राम एक्सप्रेस हा सर्वात सोयीचा पर्याय मानला जातो. मात्र, सध्याच्या परिस्थितीत या गाडीचा स्थानिक प्रवाशांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

## शेअर बाजारात पावणेदोन कोटी बुडाले; बार्शीत पत्नी, दोन्ही मुलांना विष देऊन शिक्षकाने घेतला गळफास

वैराग: शेअर बाजारातील तब्बल १ कोटी ८० लाख रुपयांच्या अवाढव्य आर्थिक नुकसानीमुळे आलेल्या नैराश्यातून एका शिक्षकाने आपल्या कुटुंबासह जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना बार्शी तालुक्यातील हत्तीज येथे घडली आहे. शिक्षकाने पत्नी आणि दोन निष्पाप मुलांना प्रथम विषारी औषध दिले आणि त्यानंतर स्वतः गळफास घेऊन जीवन संपविले. या घटनेमुळे बार्शी तालुक्यात खळबळ उडाली असून हत्तीज गावावर शोककळा पसरली आहे.

योगेश बाळासाहेब पाटील (वय ४१, व्यवसाय- शिक्षक), माधुरी योगेश पाटील (वय ३७, पत्नी), अथर्व योगेश पाटील (वय ११, मुलगा) आणि शिवांश योगेश पाटील (वय ९, मुलगा) अशी मृत पावलेल्या दुर्दैवी कुटुंबीयांची नावे आहेत. योगेश पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील चौगांव बु. येथील प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. सध्या उन्हाळी सुट्ट्या असल्याने ते आपल्या कुटुंबासह मूळ गावी हत्तीज येथे आले होत.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास



योगेश यांनी राहत्या घरी हे टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी आधी आपल्या पत्नीला आणि दोन्ही मुलांना जेवणातून किंवा अन्य माध्यमातून विषारी औषध देऊन जीवे मारले. त्यानंतर घरातच गळफास लावून स्वतःचीही जीवनयात्रा संपवली.

१ कोटी ८० लाखांचा तोटा आणि कर्जबाजारीपणा

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, योगेश पाटील हे गेल्या काही काळापासून मोठ्या आर्थिक विवंचनेत होते. त्यांना शेअर बाजारात सुमारे १ कोटी ८० लाख रुपयांचा मोठा फटका बसला होता. हे नुकसान भरून काढण्यासाठी आणि लोकांचे पैसे देण्यासाठी त्यांनी काही दिवसांपूर्वीच आपल्या आईकडून आणि नातेवाईकांकडून सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते.

घटनास्थळी २२ पानांची सुसाईड नोट

घटनेची माहिती मिळताच वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे आणि उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी सर्व मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला. यावेळी पोलिसांना घटनास्थळावरून योगेश पाटील यांनी लिहून ठेवलेली तब्बल २२ पानांची सविस्तर 'सुसाईड नोट आढळून आली आहे.

## शेतकऱ्याला डिझेल-पेट्रोल टंचाई केली तर याद राखा! कृत्रिम टंचाईविरोधात शेतकरी सेनेचा इशारा

### तहसील कार्यालयांना घेराव घालणार - ॲड. बापूसाहेब जाधव

बीड, प्रतिनिधी :

खरीप हंगाम तोंडावर असताना बीड जिल्ह्यात डिझेल आणि पेट्रोलची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेना शेतकरी सेना बीड जिल्हाप्रमुख ॲड. बापूसाहेब जाधव यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल-पेट्रोल मिळाले नाही तर जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडून तहसीलदार कार्यालयांना घेराव घातला जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सध्या पावसाळ्याची सुरुवात झाली असून शेतकरी नांगरट, पाळी, पेरणी आणि मशागतीच्या कामात व्यस्त आहे. आधुनिक शेती पूर्णपणे ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पेरणी यंत्र आणि इतर यांत्रिक साधनांवर अवलंबून आहे. या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणावर डिझेलची आवश्यकता असते. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल व पेट्रोल उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तासन्तास रांगेत उभे राहूनही रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे.

ॲड. जाधव म्हणाले की, एकीकडे इंधनाच्या वाढत्या दरांमुळे शेती करणे परवडेनासे झाले आहे, तर दुसरीकडे कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवल्या जात आहेत. पावसाच्या प्रत्येक दिवसाला महत्त्व असताना डिझेलअभावी पेरणी उशिरा होत आहे. याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर होणार आहे.

शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टावर संपूर्ण देश जगतो. मात्र त्यालाच डिझेलसाठी वणवण भटकावे लागत असेल तर ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांची तपासणी करावी आणि शेतकऱ्यांना अखंडित इंधनपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकरी सेनेच्या मते, काही ठिकाणी जाणूनबुजून डिझेल-पेट्रोलचा साठा रोखून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. अशा प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून प्रशासनाने दोषींवर कठोर कारवाई करावी. अन्यथा शिवसेना शेतकरी सेना गप्प बसणार नाही.

ॲड. बापूसाहेब जाधव यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. डिझेल-पेट्रोलची टंचाई तात्काळ दूर करा. अन्यथा बीड जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांवर हजारो शेतकऱ्यांसह मोर्चे काढून घेराव घालण्यात येईल. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरायला आम्ही मागे-पुढे पाहणार नाही.

खरीप हंगामाच्या तोंडावर निर्माण



झालेल्या या गंभीर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा शेतकरी सेनेचे आंदोलन अधिक तीव्र होईल, असा इशाराही ॲड. जाधव यांनी दिला आहे.

- ॲड. बापूसाहेब जाधव
जिल्हाप्रमुख, शिवसेना शेतकरी सेना, बीड

## परळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीमध्ये धर्मापुरी येथे गांजा विक्रेत्यावर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई ९,७७,३२०/- रुपयेचा गांजा जप्त केला

दिनांक ११/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांना गोपनिय बातमीदारां मार्फत माहिती मिळाली की, बाबुलाल उर्फ बबलु आतार, रा. धर्मापुरी ता. परळी जि.बीड हा त्याचे राहते घरामध्ये गांजाची चोरटी विक्री करत आहे अशी माहिती मिळाल्यावरुन सदरची माहिती वरीष्ठांना कळवुन त्यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. धनराज जारवाल सोबत पोह/ दिलीप गित्ते, पोह/ भागवत शेलार, पोह/ दिपक खांडेकर, मपोह / स्वाती मुंडे, चालक पोअं/ हराळे तसेच पोलीस स्टेशन परळी ग्रामीण चे सपोनि मेंडके, पोह/ वाले, पोह/ नवनाथ हरगांवकर महसुल विभागचे सक्षम अधिकारी श्रीमती पल्लेवाड मॅडम मंडळ अधिकारी,



तहसिल कार्यालय परळी, श्री. यासेर शेख, तलाठी सज्जा धर्मापुरी यांचेसह बाबुलाल उर्फ बबलु आतार याचे घरी छापा मारला असता त्याचे घरामध्ये २० किलो ३४० ग्रॅम वजनाचा गांजा मिळुन आला. तसेच गांजा विक्री करण्यासाठी एक इलेक्ट्रीक वजनकाटा असा एकुण ९,७७,३२० /- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपी विरुध्द पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथे सपोनि. धनराज जारवाल यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे परळी ग्रामीण गु.र.नं.२७४/२०२६ कलम २०, २९ छऊझड ॲक्ट नुसार आरोपी १. शेख बाबुलाल अतार, २. वशिम बाबुलाल अतार दोन्ही रा. धर्मापुरी ता. परळी, जि. बीड विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन परळी ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगीरी प्रभारी पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहायक पोलीस अधिक्षक श्री. ऋषिकेश शिंदे, उपविभाग अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्था. गु.शा. बीड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. धनराज जारवाल, पोह/ दिलीप गित्ते, पोह/ भागवत शेलार, पोह/ दिपक खांडेकर, मपोह/ स्वाती मुंडे, चालक पोअं/ हराळे तसेच पोलीस स्टेशन परळी ग्रामीणचे सपोनि मेंडके, पोह/ वाले, पोह/ नवनाथ हरगांवकर यांनी केलेली आहे.

## नीट' परीक्षेत मोठे बदल! नीट पेपर सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ

नवी दिल्ली , दि. १२ जून - नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पुनर्परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राष्ट्रीय परीक्षा संस्था एनटीऐ यांनी जाहीर केला आहे. २१ जून रोजी होणाऱ्या नीट पुनर्परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त १५ मिनिटांचा वेळ देण्यात येणार असून परीक्षेचा कालावधी आता १८० मिनिटांऐवजी १९५ मिनिटांचा करण्यात आला आहे.

एनटीऐ ने दिलेल्या माहितीनुसार, पुनर्परीक्षा दुपारी २.०० ते सायंकाळी ५.१५ या वेळेत घेण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना रफ वर्कसाठी अधिक जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीला व शेवटी दिल्या जाणाऱ्या पानांची संख्या २ वरून ४ करण्यात आली आहे.

पेपरफुटीच्या घटनेमुळे अनेक विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिक तणावाला सामोरे जावे लागल्याची बाब लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे छढ- ने स्पष्ट केले आहे. विशेष परिस्थितीत आयोजित करण्यात येणारी ही पुनर्परीक्षा विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभ आणि न्याय्य ठरावी, यासाठी परीक्षा व्यवस्थेत काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

२१ जून रोजी होणाऱ्या या पुनर्परीक्षेकडे देशभरातील विद्यार्थ्यांचे लक्ष लागले असून अतिरिक्त वेळ आणि रफ वर्कसाठी वाढीव जागेमुळे विद्यार्थ्यांना प्रश्न सोडविताना अधिक सुविधा मिळणार आहेत. एनटीऐ च्या या निर्णयाचे विद्यार्थी व पालकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

दरम्यान, पेपरफुटी प्रकरणानंतर परीक्षेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी एनटीऐ कडून विशेष खबरदारी घेण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# कडा येथील धोंडे महाविद्यालयात मुक्त विद्यापीठाच्या

## बी.एस्सी.पहिल्या बॅचचा निरोप समारंभ संपन्न

### ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा येथून बी.एस्सी.ची पहिली बॅच यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बॅचच्या ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपली अंतिम परीक्षा दिली. या यशस्वी विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात नुकताच एक शानदार आणि भावूक वातावरणात निरोप समारंभ संपन्न झाला.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनानुसार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात धोंडे महाविद्यालयात मुक्त विद्यापीठाचा बी.एस्सी.चा वर्ग सुरू केला होता. ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य नव्हते, अशा विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत वरदान ठरला आहे.




या अभ्यास केंद्राचे केंद्र संचालक तथा प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, केंद्र संयोजक डॉ. अशोक माळशिखरे आणि सहसंयोजक प्रा. बी. ए. रणदिवे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे, या बॅचमधील बहुतांश विद्यार्थी हे आधीपासूनच शैक्षणिक, वैद्यकीय, व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. आपली दैनंदिन कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी हे विज्ञान शाखेचे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, आपल्या स्वतःच्या क्षेत्रातील कार्य अविरत सुरू ठेवून, वेळेचे अचूक नियोजन करत मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राच्या माध्यमातून तुम्ही विज्ञानाचे उच्च शिक्षण घेत आहात, ही अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद बाब आहे. तुमचे हे यश इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

या स्नेहसंमेलन व निरोप समारंभाच्या प्रसंगी उमप सर, जाधव मॅडम, खंडागळे मॅडम, पंडित हजारे सर, उर्मिला राऊत मॅडम, शिंदे सर, झांबरे सर, भोसले सर, दळवी सर, देवरे सर, सूर्यवंशी सर, जोशी सर, नंदकुमार शेलार सर, काळे सर, लक्ष्मण ससाने सर, रणशिंग सर आदी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन गौतम साळवी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गाडेकर यांनी मानले. पहिल्याच बॅचच्या या यशामुळे कडा आणि आष्टी परिसरात धोंडे महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# जाफ्राबाद तहसील कार्यालयात आरओ

## मशीन बनली शोभेची वस्तू

### सामान्य नागरिकांना पिण्याचे पाणी मिळेना!



जाफ्राबाद: प्रतिनिधी

तालुक्याचे मुख्य केंद्र असलेल्या जाफ्राबाद तहसील कार्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येतात. या नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे म्हणून प्रशासनाने लाखो रुपये खर्चून आर. ओ. (ठज) वॉटर फिल्टर मशीन बसवले आहे. मात्र, योग्य देखभाल आणि प्रशासकीय दुर्लक्षामुळे हे मशीन गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे हे मशीन सध्या केवळ 'शोभेची वस्तू' बनले असून नागरिकांची पाण्यासाठी तीव्र ससेहोलपट होत आहे.नागरिकांची पाण्यासाठी भटकंतीसध्या उन्हाळ्याचे दिवस नसले तरी शासकीय कामांसाठी तासनतास थांबणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची नितांत गरज असते. मात्र, कार्यालयातील एकमेव पाण्याचा स्त्रोत बंद असल्याने नागरिकांना खाजगी दुकानातून महागडे पाणी विकत घ्यावे लागत आहे. गरीब आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या सामान्य नागरिकांना हा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.प्रशासकीय उदासीनता चव्हाट्यावरकार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पाण्याची सोय असते. मात्र, ज्या जनतेसाठी हे कार्यालय चालते, त्या सामान्य नागरिकांच्या मूलभूत सुविधेकडे मात्र प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च करून जर मशीन बंदच ठेवायचे होते, तर ते बसवले कशासाठी? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.या गंभीर समस्येकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देऊन बंद पडलेले ठज मशीन तातडीने दुरुस्त करावे, अशी मागणी जाफ्राबाद तालुक्यातील जनतेकडून केली जात आहे.

# जाफ्राबादमध्ये सर्वधर्मीय नागरिकांचा मोर्चा; शेख मोसीन मजीद हत्या प्रकरणात न्यायाची मागणी

जाफराबाद प्रतिनिधी

जाफ्राबाद येथील व्यापारी शेख मोसीन मजीद यांच्या हत्येप्रकरणी न्याय मिळावा तसेच आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी गुरुवारी जाफ्राबाद शहरात सर्वधर्मीय नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

बसस्थानक परिसरातून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. त्यानंतर नागरिकांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार अविनाश लोंढे यांच्यामार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले.




निवेदनात नमूद करण्यात आले की, २७ मे २०२६ रोजी बुलेट मोटारसायकल चोरी करून पळून जाणाऱ्या आरोपींचा पाठलाग करत असताना शेख मोसीन मजीद आणि त्यांचे पुतणे साहील मोबीन शेख यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात शेख मोसीन मजीद यांचा मृत्यू झाला, तर साहील शेख गंभीर जखमी झाले.घटनेनंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली असली तरी या प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात घेण्यात यावी, तपास अधिक प्रभावीपणे पूर्ण करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.मोर्चादरम्यान पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे, महेश वैद्य यांच्यासह पोलीस प्रशासनाचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडले.

या आंदोलनात विविध व्यापारी संघटना, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी शेख मोसीन मजीद यांना न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत, अशी भावना व्यक्त केली.

निवेदनावर वकील संघाचे अध्यक्ष ड. विनोद श्रीराम डिगे, रामधन पाटील कळंबे, दिपक पाटील वाकडे, संजय लहाने,सुरेश गवळी, मोईन खान पठाण, शेख इरफान, सलमान रशीद कुरेशी, शेख हुजेर, शेख फैसल, ड. शेख सादिक, शेख कदीर, पठाण सलमान, शेख मोबीन, शेख नाजीम, फारूक कुरेशी, फईम खान यांच्यासह विविध व्यापारी संघटना, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि सर्वधर्मीय नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.मोर्चानंतर शहरात या प्रकरणाबाबत चर्चा सुरू असून न्यायाच्या मागणीला

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात आष्टीत

## संविधान बचाव मोर्चा शासनाला इशारा

आष्टी प्रतिनिधी :- अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आष्टी येथे गुरुवारी दि.१२जून भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.जय भीम,जय संविधान च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला असून शासनाने उपवर्गीकरणाचा निर्णय मागे न घेतल्यास राज्यव्यापी लोकशाही आंदोलन उभारण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच समिती आष्टी यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून मोर्चाला सुरुवात झाली. गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत मोर्चा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात पोहोचला. यावेळी आयोजित सभेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

सभेला संबोधित करताना परतूर वकील संघाचे सचिव ड. वेडेकर यांनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक एकात्मतेवर उपवर्गीकरणामुळे घाला घातला



जाऊ शकतो, अशी भूमिका मांडली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक अन्याय सहन केलेल्या समाजाला संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत एकसंध ओळख दिली असून त्या अधिकाराला धक्का पोहोचविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात शासनाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी न्यायमूर्ती अनंत बदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करावा जातीनिहाय जनगणना करावी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण वाढवावे शासकीय सेवांमधील अनुशेष भरावा तसेच आरक्षणाच्या अमलबजावणीसाठी स्वतंत्र कायदा करावा अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

आंदोलकांनी स्पष्ट केले की हा संघर्ष कोणत्याही समाजाविरोधात नसून संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आहे. अनुसूचित जातींमध्ये फूट पाडणारे कोणतेही धोरण लागू करू नये तसेच सामाजिक न्याय,समता आणि बंधुतेच्या तत्त्वांनुसार शासनाने निर्णय घ्यावेत अशी मागणी करण्यात आली.

शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश समोर ठेवून संविधान बचावासाठी हा लढा उभारण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.मोर्चा अत्यंत शांततापूर्ण वातावरणात पार पडला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती परिसरातून निघालेला मोर्चा अंबड पाटी चौफुली येथील अण्णाभाऊ साठे चौकात समाप्त झाला.

मोर्चा यशस्वी करण्यासाठी आष्टी पोलीस ठाण्याचे एपीआय गणेश उर्वशी, पीएसआय चाटे, पोलीस कॉन्स्टेबल वाघमारे, शिंदे, चव्हाण, ढाकणे, कावळे, बादाडे आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभल्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

यावेळी अतुल रमेश कांबळे, रोहन वाघामारे, योगेश मधुकर मोरे, उद्धव डोळस, शिवाजी डोळस, गौतम शेळके, अर्जुन सौंदर्य, नितीन मोरे, सुनील मोरे, पोपट मोरे, भगवान कांबळे, संदीप मोरे, प्रकाश डोळस, सनी डोळस, रोहिदास मस्के, प्रल्हाद लाडे, गणेश वैद्य, भारसाकळे, संतोष खरात, विशाल इंगोले यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक आधी कर्ज भरा मग माफी घ्या ही कसली योजना ?



### भोकरदन तहसीलवर माजी आमदार चंद्रकांत दानवेंचा घणाघात जाचक अटी रद्द करून सरसकट २ लाखांची कर्जमाफी देण्याची जोरदार मागणी

भोकरदन इसरारखान पठाण :-

राज्य सरकारने मोठ्या गाजावाजासह जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना ही प्रत्यक्षात कर्जमाफी नसून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आणि बँकांची कर्जवसुली करणारी योजना आहे असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी केला. सरकारच्या या शेतकरीविरोधी धोरणांचा तीव्र निषेध करत दानवे यांच्या नेतृत्वाखाली भोकरदन तहसील कार्यालयावर आज प्रचंड मोर्चा धडकला.

यावेळी तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. गेल्या तीन वर्षांपासून नापिकी दुष्काळ अवकाळी पाऊस गारपीट आणि अतिवृष्टीमुळे बळीराजा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. शेतीचा उत्पादन खर्च दुपटीने वाढला असताना मालाला कवडीमोलाचा भाव मिळत आहे. अशा अत्यंत बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याऐवजी, सरकार जाचक अटी लादून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे असा संताप चंद्रकांत दानवे यांनी व्यक्त केला.

३३ लाख शेतकऱ्यांवर अन्याय एकवेळ समझोता म्हणजे थट्टाच

पत्रकारांशी बोलताना माजी आमदार दानवे यांनी सरकारच्या दुटप्पी भूमिकेवर कडाडून टीका केली. ते म्हणाले:

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ देणे हा उघडउघड अन्याय आहे. शेतकरी हा शेतकरीच असतो, त्याला जुन्या आणि नव्या लाभार्थ्यांमध्ये विभागून न्याय नाकारण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला ? निवडणुकीपूर्वी गगनभेदी आश्वासने द्यायची आणि आता अटी-शर्तींच्या जाळ्यात अडकवायचे हा धंदा थांबला पाहिजे.एकवेळ समझोता जढड योजनेवर प्रहार करताना ते म्हणाले की आधी लाखो रुपयांची थकबाकी भरा आणि मग कर्जमाफीचा लाभ घ्या ही अट म्हणजे गरीब शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. ज्याच्याकडे आधीच पैसे असतील तो कर्जमाफीची वाट कशाला पाहील ? ही योजना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी नसून केवळ बँकांची बुडीत खाती आणि थकबाकी वसूल करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.४ वर्षांची अट अव्यवहार्य रोहित पवारांच्या आंदोलनाला पाठिंबा

प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अट अत्यंत अव्यवहार्य आणि वास्तवापासून दूर आहे. नैसर्गिक आपत्ती आणि बाजारातील अनिश्चितता पाहता ही अट शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याचा हुकमी डाव आहे. आज शेतकरी आत्मविश्वासाने नाही तर अश्रूंनी जगत आहे अशी खंत व्यक्त करत दानवे यांनी कर्जमाफीच्या मुद्द्यावर आमदार रोहितदादा पवार यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. हा लढा महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काचा लढा असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.तर राज्यभर तीव्र आंदोलन प्रमुख ४ मागण्या

माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी सरकारला सज्जड इशारा देत खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत

सरसकट कर्जमाफी सर्व जाचक अटी व शर्ती तात्काळ रद्द करून कोणत्याही अटीशिवाय शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी लागू करावी.

वंचित शेतकऱ्यांना न्याय २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ लाभ द्यावा.१ रुपयात पीकविमा पीकविमा योजनेतील शेतकरीविरोधी जाचक अटी रद्द करून पुन्हा एकदा १ रुपयांत पीकविमा योजना पूर्ण क्षमतेने सुरू करावी.

पेरणीपूर्व आर्थिक मदत आगामी खरिपाच्या पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात आवश्यक ती आर्थिक मदत थेट जमा करावी.

जर सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील. त्यानंतर निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला सर्वस्वी राज्य सरकारच जबाबदार राहील असा थेट इशारा दानवे यांनी दिला.

निवेदनावेळी नेत्यांची अफाट गर्दी या आंदोलनाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष रमेशशेठ सपकाळ, युवक तालुकाध्यक्ष प्रा. डॉ. अंकुश जाधव, जिल्हा सरचिटणीस प्रा. संग्रामराजे देशमुख, अब्दुल कदिर बापू, अजहर शहा, नसीम पठाण, डॉ. शालिकराम सपकाळ, चंद्रकांत पगारे, गजानन वनारसे, सर्जेराव कड, पुंजाराम साबळे, अन्वर शेख, गजानन घोडे, रघुनाथ पांडे, गंगाधर कांबळे, रावसाहेब दाभाडे, महेश औटी, शेख तालेब अब्दुल रऊफ, शेख हक्कानी शेख गणी, अब्दुल मुजिब कादरी, केतन साळवे, अंगद सहाणे, समाधान रेंढे यांच्यासह तालुक्यातील हजारो शेतकरी, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




आष्टी - लोकमत आयोजित सरपंच ऑफ द इयर या पुरस्काराने जामगावचे सरपंच श्री. राधेश्याम (भैय्या) धस यांना सन्मानित करण्यात आले.(छाया-एस.राजेंद्र लाड)

# अभिषेक घाडगे एमबीबीएस वैद्यकीय परिक्षेत उत्तीर्ण

घुंगर्डे हादगाव/ प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथील अभिषेक शारदा दिपक घाडगे वैद्यकीय क्षेत्रात पाऊल टाकत एमबीबीएस वैद्यकीय परिक्षेत उत्तीर्ण झाला आहे. लातुर येथील आय आय बी क्लासेस अकारावी व बारावी क्लासेस केल्यानंतर बारावी पेरीक्षेत ७८, टक्के पडल्यानंतर नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला होता. आत्ताच झालेल्या एमबीबीएस वैद्यकीय परिक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. या मेहनीतीमध्ये आई वडील तसेच कुटुंबियांचे पाठबळ व मोलाचे मार्गदर्शन मिळाल्याने,वैद्यकीय क्षेत्रात



यशस्वी होऊन भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करून समाजसेवेत मोलाचे योगदान देणार असल्याचे डॉ.अभिषेक घाडगे याने सांगितले, उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी याशोचित सन्मान करण्यात आला आहे.

# कै.विठाबाई बाबुराव गर्जे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त

## भावपूर्ण श्रद्धांजली

मंगळवारी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील पाटसरा येथील ज्येष्ठ व धर्मपरायण व्यक्तिमत्त्व कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दशक्रिया विधी व श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या निधनामुळे गर्जे परिवारासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, त्यांच्या साध्या, संयमी आणि कष्टाळू जीवनकार्याच्या आठवणींना उजाळा दिला जात आहे.

कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांचे निधन दि. ७ जून २०२६ रोजी झाले. त्यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबातील सर्व सदस्यांना संस्कार, प्रामाणिकपणा आणि कष्टाची शिकवण दिली. कुटुंबाच्या जडणघडणीत त्यांचे योगदान मोलाचे राहिले. गावातील सामाजिक, धार्मिक व कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असायचा. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्यांना समाजात विशेष मान-सन्मान प्राप्त होता. त्यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम मंगळवार दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पाटसरा येथे आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त धार्मिक वातावरणात विविध विधी पार पडणार असून, उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे.

कार्यक्रमात प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. श्री. काशिनाथ महाराज (गणेशगड संस्थान, नागतळा) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ९ ते ११ या वेळेत होणाऱ्या या प्रवचनातून अध्यात्म, जीवनमूल्ये, मानवी कर्तव्य आणि सदाचार यांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे कार्यक्रमाला धार्मिक आणि आध्यात्मिक स्वरूप प्राप्त होणार आहे.

कै. विठाबाई गर्जे यांच्या पश्चात



मुले श्री. अण्णासाहेब बाबुराव गर्जे, श्री. सुंदरलाल बाबुराव गर्जे, कन्या सौ. इंदुबाई श्रीराम गीते, सौ. रुख्मिणी निवृत्ती जायभाये तसेच नातवंडे आणि मोठा परिवार असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असला तरी त्यांनी दिलेले संस्कार आणि जीवनमूल्ये पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

गर्जे परिवाराच्या वतीने सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ व हितचिंतकांना दशक्रिया विधी व श्रद्धांजली कार्यक्रमास उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांचे संपूर्ण आयुष्य कुटुंबाच्या सेवेसाठी, समाजातील सलोखा टिकवण्यासाठी आणि धार्मिक मूल्यांचे जतन करण्यासाठी समर्पित राहिले. त्यांच्या निधनाने एक प्रेमळ माता, कर्तव्यदक्ष गृहिणी आणि कुटुंबाचा आधारवड हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. त्यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना ग्रामस्थांनी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी प्रार्थना केली आहे.

# शिक्षक ते प्राथमिक शिक्षणाधिकारी : श्री.भगवानराव सोनवणे

# सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर मिळाला उच्च सन्मान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात मिळणारा सन्मान हा त्यांच्या कार्याचा गौरवच असतो. बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे श्री. भगवानराव सोनवणे यांच्याकडे बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असून, त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेला मिळालेला हा मानाचा तुरा मानला जात आहे.

सध्या श्री. भगवानराव सोनवणे हे पंचायत समिती बीड येथे गटशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आणि आदर्शवत राहिला आहे. शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या सेवेला प्रारंभ केला. गणित विषयाचे अत्यंत शिस्तप्रिय, अभ्यासू आणि विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने ज्ञान देणारे शिक्षक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. अध्यापनातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता आणि शिक्षणाविषयीची बांधिलकी यामुळे त्यांनी अल्पावधीतच विद्यार्थ्यांसह पालक आणि सहकाऱ्यांचा विश्वास संपादन केला.

शिक्षक पदावर कार्यरत असताना त्यांनी सातत्याने स्वतःचा अभ्यास आणि प्रशासकीय कौशल्ये विकसित केली. त्यानंतर स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून ते जिल्हा परिषद सेवेत शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून रुजू झाले. पुढे विविध पदांवर काम करताना त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. ग्रामीण भागातील शाळांचा विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, शिक्षक प्रशिक्षण तसेच विद्यार्थीकेंद्रित योजनांची यशस्वी अंमलबजावणी यामध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले आहे.

दोन तपाहून अधिक काळ अधिकारी म्हणून कार्य करताना



त्यांनी शिक्षण विभागातील विविध प्रशासकीय टप्पे जवळून अनुभवले. विशेष म्हणजे या कालावधीत तब्बल २७ शिक्षणाधिकाऱ्यांसोबत त्यांनी काम केले असून, आज ते स्वतः २८ व्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यकाळात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळत आहेत. शिक्षण क्षेत्रातील बदल, शासकीय धोरणे आणि विविध आव्हानांचा सामना करताना त्यांनी नेहमीच समन्वय, संयम आणि कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केला.

श्री. भगवानराव सोनवणे यांचे व्यक्तिमत्त्व शांत, संयमी, अभ्यासू आणि सकारात्मक विचारांचे आहे. कोणतीही जबाबदारी स्वीकारताना त्यांचा दृष्टिकोन अत्यंत व्यावहारिक आणि परिणामकारक राहिला आहे. अधिकारी म्हणून त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांचे हित, शिक्षकांच्या समस्या आणि शैक्षणिक गुणवत्तेचा विकास यांना प्राधान्य दिले. त्यामुळेच शिक्षण विभागात एक कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि लोकाभिमुख अधिकारी म्हणून त्यांची ख्याती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे वयोमानानुसार वयाची ५८ वर्षे पूर्ण करून ते ३० जून २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. अशा वेळी त्यांच्या प्रदीर्घ सेवेला मिळालेला प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार हा त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा आणि गौरवास्पद टप्पा ठरत आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि प्रशासकीय कौशल्याचा लाभ जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राला निश्चितच होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

श्री. भगवानराव सोनवणे यांच्या या नियुक्तीबद्दल शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. शिक्षक म्हणून सुरू झालेला त्यांचा प्रवास प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाच्या जबाबदारीपर्यंत पोहोचणे ही शिक्षण क्षेत्रातील अनेकांसाठी प्रेरणादायी यशोगाथा ठरली आहे.




## व्हिजन अकॅडमी तर्फे इयत्ता दहावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळावी, त्यांच्यात स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी आणि कठोर परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित व्हावे या उद्देशाने व्हिजन अकॅडमी तर्फे आयोजित करण्यात आलेला इयत्ता दहावी मधील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, पदक व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशामागील पालक, शिक्षक व मार्गदर्शकांच्या योगदानाचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. विष्णू घुगे सर (संचालक, द ब्रेन स्मिथ एज्युकेशन सर्व्हिसेस) हे उपस्थित होते. तसेच श्री. धीरज शिंदे सर (संचालक, व्हिजन अकॅडमी), श्रीमती मोहिनी शिंदे मॅडम, श्री सुरेश घुगे सर तसेच अकॅडमीचे शिक्षक व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. विष्णू घुगे यांनी सांगितले की, यश हे एका दिवसात मिळत नाही. सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे व्यवस्थापन, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावरच विद्यार्थ्यांना मोठी झेप घेता येते. गुण महत्त्वाचे असले तरी त्यामागील ज्ञान, जिज्ञासा आणि मेहनत अधिक महत्त्वाची असते. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण आणि करिअरविषयी मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी व्हिजन अकॅडमीच्या शिक्षकांचा परिचय करून देण्यात आला. सोमेश सिमरे सर (भौतिकशास्त्र), जानवी कुमावत मॅडम (रसायनशास्त्र), रवी दत्त सैनी सर (जीवशास्त्र) आणि मारुती बोबडे सर (गणित) यांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी घेतलेल्या मेहनतीचा विशेष उल्लेख करण्यात आला. तसेच त्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

## बीड जिल्ह्यातील जनतेच्या विश्वासाचे नेतृत्व लोकनेते,मराठवाडा भूषण आ.सुरेश आण्णा धस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्ह्याच्या राजकारणात आपल्या आक्रमक शैली, जनसंपर्क, लोकहिताच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जनतेच्या हितासाठी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे ओळख निर्माण करणारे आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार लोकनेते, मराठवाडा भूषण सुरेश (आण्णा) धस हे आज जिल्ह्यातील प्रभावी नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत. त्यांच्या कार्यशैलीमुळे समर्थकांकडून त्यांना प्रेमाने बीड जिल्ह्याचा एकच टायगर अशी उपाधी दिली जात असून, जिल्हाभरात त्यांच्या नेतृत्वाबाबत मोठा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांपासून ते शेतकरी, विद्यार्थी, महिला, बेरोजगार युवक आणि ग्रामीण भागातील विकासकामांपर्यंत प्रत्येक विषयावर सातत्याने आवाज उठविणारे आ. सुरेश धस यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत जनतेशी थेट नाळ जोडून ठेवली आहे. मतदारसंघातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण, आरोग्य आणि सिंचन यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी शासन दरबारी अनेक वेळा प्रभावी पाठपुरावा करून विविध विकासकामांना मंजुरी मिळवून दिली आहे.

आ. धस यांची ओळख केवळ राजकारणी म्हणून नसून संघर्षशील लोकनेते म्हणूनही आहे. जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी ते प्रशासनाशी सातत्याने संवाद साधतात. शेतकऱ्यांच्या वीज, पाणी आणि पीकविम्याच्या प्रश्नांवर त्यांनी विधानसभेत तसेच विविध स्तरांवर ठाम भूमिका मांडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी वर्गामध्ये त्यांच्याबद्दल विशेष आत्मीयता आणि विश्वास निर्माण झाला आहे.

बीड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी निर्भीडपणे भूमिका घेतली. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी संघर्ष करणे ही त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. त्यामुळेच त्यांच्या सभांना आणि कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून युवकांमध्येही त्यांचे नेतृत्व लोकप्रिय ठरत आहे.

सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक उपक्रमांमध्येही आ. सुरेश धस यांचा सक्रिय सहभाग असतो. विविध संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, गरजू कुटुंबांना मदत, आरोग्य शिबिरे, रोजगार मार्गदर्शन आणि सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यामुळे त्यांची प्रतिमा केवळ राजकीय नेत्यापुरती मर्यादित न राहता समाजाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून अधिक मजबूत झाली आहे.

आज बीड जिल्ह्यातील राजकीय घडामोडींमध्ये आ. सुरेश (आण्णा) धस यांचे नाव प्रभावीपणे घेतले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते आणि युवक प्रेरित होत असून, जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे, विकासाला प्राधान्य देणारे आणि सर्वसामान्यांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण करणारे आ. सुरेश (आण्णा) धस हे आज बीड जिल्ह्याच्या राजकारणातील एक प्रभावी आणि दमदार नेतृत्व म्हणून ओळखले जात आहेत.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेले हे नेतृत्व आगामी काळातही जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि विकासाची गती कायम



ठेवण्यासाठी अधिक जोमाने कार्यरत राहील, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच जिल्हाभरात एकच चर्चा ऐकायला मिळते - बीड जिल्ह्याचा एकच टायगर, लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश (आण्णा) धस.

# देवप्राप्ती होते- श्री ह भ प सुरेश महाराज जाधव

लिंबागणेश - संत ईश्वर भारती महाराज यांच्या समाधीच्या सेवेने देवप्राप्ती होते. संतांच्या दरबारात सेवा करण्याचे भाग्य पूर्व पुण्याईने मिळते. अधिकमासात संतांच्या दरबारात केलेली सेवा दुप्पट फळ देते.असे प्रतिपादन श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी केले. अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे सुरू असलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या दिवसाचे किर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज भारती श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे,श्री ह भ प बबन महाराज मंजरीकर, श्री ह भ प तुपे महाराज, बबन महाराज, यांच्यासह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे अधिकमासाच्या पावनपर्वावर भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.या सप्ताहात सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी गुंफले यावेळी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या..

भावे गावे गीत ।शुद्ध करूनियां चित्त ।। १ ।।<br>
तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।। २ ।।<br>
आणिकांचे कानी ।गुण दोष मना नाणी ।। ३ ।।<br>
मस्तक ठेंगणा ।करी संतांच्या चरणा ।। ४ ।।<br>
वेंची ते वचन ।जेणे राहे समाधान ।। ५ ।।<br>
तुका म्हणे फार ।थोडा तरी परउपकार ।। ६ ।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. मानवी



जीवन जगत असताना माणसाच्या जीवनामध्ये लग्न आयुष्यात आल्यानंतर एकदाच कराव . कुंभ स्नान तीन वर्षातून एकदा करावं. देव आणि संतांची वारी वर्षातून एकदा करावी. व्यायाम, अभ्यास,दान आणि संघष्ठन माणसाने दररोज करावे.असे महाराजांनी सांगितले. संतांची सेवा आणि संतांचा सत्संग दररोज मिळवण्यासाठी प्रयत्न करावा. संतांच्या संगती मध्ये गेल्यानंतर जीवनाचे सोने आणि कल्याण होते. सत्संगती मध्ये गेल्यानंतर देवप्राप्तीचा साधनेचे वर्म कळते. एवढेच नाही तर संत हे प्रत्येक पावला पावलाचे मार्गदर्शन जीवाला करतात.

भजन करायचं असेल तर ते कसं केलं पाहिजे.. हे या अभंगातून सांगतात.शुद्धभावयुक्त अंतकरणाने केलेले भजन हे देवप्राप्तीचे सोपे साधन आहे.ते करावे असेही महाराजांनी सांगितले. दुसऱ्यांच्या गुणदोषाचे चिंतन न करणे, संतांच्या चरणाजवळ शुद्ध अंतकरणाने नतमस्तक होऊन सेवा करणे, देवप्राप्तीचे सोपे साधन आहेत तर बोलत असताना पुढील व्यक्तीचे अंतकरणात समाधान निर्माण होईल असं बोललं पाहिजे. बरेच असेल त्या ठिकाणी थोडा का होईना परोपकारकर्ता आला पाहिजे. एवढं केलं तरी देवप्राप्ती होऊ शकते. असं महाराजांनी सांगितलं.

यावेळी वेगवेगळी उदाहरणे देत,व्यसनमुक्तीचा संदेश, स्त्री सक्षमीकरण, अभ्यासाचे महत्त्व, मुलांना संस्कार द्या, आई-वडिलांची सेवा करा. प्रत्येक मुलांनी आई-वडिलांचं ऐकलं पाहिजे गुरुजनांच्या संदर्भात आदरयुक्त भीती असली पाहिजे. जेवण करत असताना अन्नपदार्थाचा नास होऊ देऊ नका.अशा विविध सामाजिक विषयाचे प्रबोधन केले. महाराजांनी विनोदी शैली मधून लोकांना सामाजिक प्रबोधन केल्याने कीर्तनात श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी कीर्तनात साथ संगत. भजन सम्राट शहादेव महाराज येडे, संगीत अलंकार किशोर महाराज येडे, माऊली महाराज खोटे, मृदंग साथ अशोक महाराज येडे, बजरंग महाराज पावणे, व बेलेश्वर संस्थांवरील शेकडो टाळकरी मंडळी विणेकरी,चोपदार, तुळशीवाली माता भगिनी उपस्थित होते.

# आरक्षण बचाव वर्गीकरण हटाव

## बीड येथे १५ जून रोजी वकिलांची निदर्शने

बीड /प्रतिनिधी (लोकदिशा न्यूज)

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचे निश्चित केले आहे हे अनुसूचित जातीमध्ये फूट पाडून आरक्षण संपवण्याचे षडयंत्र आहे. याला विरोध करण्यासाठी बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या वकिलांच्या वतीने बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक १५ जून २०२६ रोजी दुपारी १:३० वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत तरी बीड जिल्ह्यातील वकील बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स फोरम बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातीच्या सर्व घटकांना शासकीय व शैक्षणिक क्षेत्रात आरक्षणाचा अधिकार मिळवून दिला होता या समाजाला १३% आरक्षण देऊन समान संधी देण्यात आली होती. यामुळे बऱ्याच प्रमाणात अनुसूचित जातीला याचा फायदा झाला व समाज प्रगती करून लागला जो शिक्षणात मागे राहिला त्याची  ज्यांनी गुलामगिरी सोडली नाही तो घटक मागे राहिला जातिवादी




शक्तीने आरक्षणाला विरोध केला तीच शक्ती आज सत्तेत आहे काही मनवादी चमच्यांना हाताशी घेऊन अनुसूचित जातीमध्ये फूट पाडण्यासाठी आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचे व सर्वच आरक्षण संपण्याचे षडयंत्र सरकार करत आहे. या धोरणाला विरोध करण्यासाठी या निदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी बीड जिल्ह्यातील सर्व अनु.जातीच्या वकिलांनी या आंदोलनात सहभागी व्हावे

# डोंगर पोखरणाऱ्यांवर जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

## इमामपूर रोडवरील अनधिकृत उत्खननावर धडक कारवाई

निसर्गाची संपत्ती ही केवळ आजच्या पिढीची नव्हे , तर भावी पिढ्यांचीही अमूल्य ठेव आहे . मात्र काही जण अल्पकालीन आर्थिक फायद्यासाठी पर्यावरणाच्या मुळावर घाव घालत असल्याचे प्रकार अधूनमधून समोर येत असतात . अशाच एका प्रकारावर बीड महसूल प्रशासनाने धडक कारवाई करत इमामपूर रोडवरील डोंगर भागात सुरू असलेले अनधिकृत उत्खनन उघडकीस आणले . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत उत्खननातून गौण खनिजाची वाहतूक करणारे दोन हायवा ताब्यात घेण्यात आले असून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे .

इमामपूर रोड परिसरातील डोंगराळ भागात काही दिवसांपासून संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती महसूल प्रशासनाला प्राप्त झाली होती . डोंगर भागातील माती , मुरूम आणि इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून त्याची वाहतूक होत असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली . पर्यावरण संरक्षण आणि शासनाच्या महसुलाचे होणारे नुकसान लक्षात घेता त्यांनी स्वतः संबंधित परिसराची पाहणी करण्याचा निर्णय घेतला . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी महसूल पथकासह घटनास्थळी अचानक भेट दिली असता डोंगर भागात उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आले . प्रशासनाची चाहूल लागताच काहीजणांनी घटनास्थळावरून निसटण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळाली . मात्र महसूल पथकाने तत्परता दाखवत उत्खननातून गौण खनिज वाहून नेणारे दोन हायवा ताब्यात घेतले . त्यानंतर वाहनचालक आणि संबंधित व्यक्तींची चौकशी करण्यात आली . उत्खननासाठी आवश्यक परवानग्या , वाहतूक परवाने आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली .

या कारवाईत नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , मंडळ अधिकारी अनिल तांदळे , ग्राम महसूल अधिकारी प्रशांत कुलकर्णी , हरिदास काकडे , सचिन एरंडे , तफेदार दिनेश माने तसेच गणेश चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली . महसूल विभागाच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई करून अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला की , शासनाच्या मालमत्तेची लूट आणि पर्यावरणाची हानी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही .

अनधिकृत उत्खनन ही केवळ महसूल विभागाची बाब नसून पर्यावरणाशी निगडित गंभीर समस्या आहे . डोंगरांचे उत्खनन झाल्यामुळे नैसर्गिक जलसंधारण व्यवस्था बिघडते , मातीची धूप वाढते आणि भूगर्भातील जलसाठ्यांवर विपरीत परिणाम होतो . डोंगर आणि टेकड्या या



परिसरातील नैसर्गिक संतुलन राखण्याचे महत्त्वाचे काम करतात . त्यांचे अतिक्रमण किंवा बेकायदेशीर उत्खनन झाल्यास भविष्यात भूस्खलन , पाण्याची टंचाई , जैवविविधतेचा ऱ्हास आणि पर्यावरणीय असमतोल निर्माण होण्याचा धोका वाढतो . विशेषतः बीडसारख्या दुष्काळप्रवण जिल्ह्यात डोंगर आणि नैसर्गिक जलवाहिन्यांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते . स्थानिक नागरिकांच्या मते , काही ठिकाणी सुरू असलेल्या अनधिकृत उत्खननामुळे परिसरातील रस्त्यांचीही हानी होत आहे . मोठ्या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे धुळीचे प्रमाण वाढते , अपघातांचा धोका निर्माण होतो आणि ग्रामस्थांच्या आरोग्यावरही परिणाम होतो . त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी सातत्याने होत होती . महसूल प्रशासनाने केलेल्या या कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी यावेळी सांगितले की , शासनाची परवानगी न घेता करण्यात येणारे कोणतेही उत्खनन बेकायदेशीर असून त्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल . पर्यावरणाचा समतोल राखणे आणि शासनाच्या महसुलाचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे . अनधिकृत उत्खननामुळे परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्ती धोक्यात येते आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो . त्यामुळे अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही . संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून दोषींवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली .

# लोहा तालुक्यात १३४३ शेतकऱ्यांना बियाणे वाटप सुरू

लोहा /प्रतिनिधी

लोहा राष्ट्रीय खाद्यतेल अभियान २०२६-२७ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार निवड झालेल्या १३४३ शेतकऱ्यांना लोहा तालुक्यात प्रमाणित बियाणे वाटपाची प्रक्रिया सुरळीत सुरू झाली आहे.

तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबवली जात आहे. तालुक्यातील पाच हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यासाठी अर्ज केले होते. यापैकी १३४३ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. महाबीज आणि कृषक भारती सहकारी संस्थेच्या माध्यमातून सार्थक कृषी केंद्र लोहा, बारको कृषी केंद्र लोहा, शेतकरी बीज भांडार लोहा आणि न्यू बालाजी कृषी केंद्र मारतळा या चार केंद्रांवर बियाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

आतापर्यंत ५७७ क्विंटल प्रमाणित बियाणे वितरित करण्यात आले असून, सुमारे ७५० शेतकऱ्यांना मोफत बियाणे मिळाले आहेत. पुढील आठवड्यात आणखी १५० क्विंटल बियाणे उपलब्ध होणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांनी दिली.



शेतकऱ्यांच्या सोयीसाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या यादी तालुका कृषी कार्यालयाच्या वार्ताफलकावर लावण्यात आल्या आहेत. प्रक्रिया पारदर्शक व्हावी यासाठी कासराळे स्वतः कृषी केंद्रांना भेट देत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. श्रीमती स्वाती टेळे (गुण नियंत्रक अधिकारी), लक्ष्मण हंडे व विजय काकडे (सहायक कृषी अधिकारी) यांच्या टीमसोबत ही मोहीम यशस्वीपणे राबवली जात आहे.

महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार ५ हजारांहून अधिक अर्जांमधून १३४३ शेतकऱ्यांची निवड केली आहे. आतापर्यंत ५७७ क्विंटल बियाणे वितरित झाले असून, पुढील आठवड्यात आणखी १५० क्विंटल उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनी बियाण्याचा पुरेपूर वापर करून आधुनिक खते, पाणी व्यवस्थापन आणि कीड नियंत्रण तंत्राचा अवलंब करावा. केवळ बियाणे मिळवणे पुरेसे नाही, तर त्याची पूर्ण क्षमता वापरून उत्पादन वाढवणे हे खरे आव्हान आहे, असे आवाहन प्रशांत कासराळे यांनी केले.या मोहिमेमुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे वेळेवर मिळून उत्पादन वाढीसह उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

# अवैध धंदे बंद करा, अन्यथा जनआंदोलन

## छेडू - तामसा पोलीस ठाण्यात निवेदन

तामसा प्रतिनिधी ।

तामसा शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध मटका व्यवसायावर तात्काळ कारवाई करून हे अवैध धंदे बंद करण्यात यावेत, अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देणारे निवेदन तामसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, तामसा शहरात अवैध मटका व्यवसाय खुलेआम सुरू असून त्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत आहे. विशेषतः गरीब व मजूर वर्गातील नागरिक या व्यसनाच्या आहारी जात असून त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. अनेकजण कर्जबाजारी होत असून कुटुंबीयांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे.

यापूर्वीही संबंधित अवैध व्यवसायाबाबत तक्रारी करण्यात आल्या असतानाही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने तातडीने चौकशी करून शहरातील सर्व अवैध मटका



केंद्रांवर धडक कारवाई करावी व हा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच दोन दिवसांच्या आत योग्य ती कारवाई न झाल्यास जनआंदोलन, उपोषण व इतर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनावर भीम आर्मी जिल्हा कार्याध्यक्ष विष्णुदास रमेश कदम, सामाजिक कार्यकर्ते शरद गौतम जाधव तसेच अखिल भारतीय समाज सेना संस्थापक अध्यक्ष भगवान किसनराव भोयर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तामसा परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून आता पोलीस प्रशासन यावर कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा 'सस्पेन्स' वाढला

## गाळे वाटप, नातेवाईकांना लाभ आणि शाळेसाठी जागा भाडेतत्त्वावर दिल्याची चर्चा

तामसा /प्रतिनिधी :

हदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत तामसा उपबाजार समितीमध्ये गाळे वाटप प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. गाळ्यांचे वाटप अधिकृत पद्धतीने झाले की अनाधिकृतरित्या, याबाबत शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, काही गाळे संचालक मंडळाशी संबंधित नातेवाईक तसेच राजकीय पुढाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींना देण्यात आल्याचा आरोप होत आहे. गाळे वाटपासाठी खुली निविदा प्रक्रिया, लिलाव किंवा पारदर्शक निकष अवलंबले गेले होते का, याबाबतची माहिती अद्याप स्पष्टपणे समोर आलेली नाही.

याशिवाय आणखी एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या जागेत एका खाजगी इंग्रजी शाळेला भाडेतत्त्वावर जागा देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. कृषी मालाच्या खरेदी-विक्रीसाठी आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी असलेल्या बाजार समितीच्या जागेचा शैक्षणिक संस्थेसाठी वापर करण्यास कोणत्या नियमांनुसार परवानगी देण्यात आली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नियमांनुसार बाजार समितीची मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची मंजुरी, ठराव, भाडेकरार आणि महसूल अटी आवश्यक असतात. मात्र संबंधित प्रकरणात सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या होत्या का, याची माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही.

दरम्यान, गाळे वाटप, भाडेकरार, बाजार समितीच्या जागेचा वापर आणि आर्थिक व्यवहारांची संपूर्ण माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्याची तयारी काही नागरिकांनी सुरू केली आहे. या प्रकरणातील सत्य परिस्थिती समोर आणण्यासाठी सहकार विभागाने स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभाराबाबत निर्माण झालेल्या या प्रश्नांमुळे गाळे कोणाला आणि कोणत्या निकषांवर मिळाले?, खाजगी शाळेला जागा कशी देण्यात आली?, बाजार समितीला त्यातून किती महसूल मिळतो? आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय प्राधान्याने घेतले जात आहेत का? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

या सर्व मुद्द्यांवर बाजार समिती प्रशासन आणि संबंधित पदाधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, याकडे आता शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे. चौकशीनंतरच या संपूर्ण प्रकरणातील वास्तव समोर येणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# हेडगेवार चौकात झेब्रा क्रॉसिंगच्या कामास प्रारंभ; ज्येष्ठ नागरिक संघाच्या पाठपुराव्याला यश

## कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांचे मानले आभार

नायगाव प्रतिनिधी

नायगाव शहरातील अत्यंत वर्दळीच्या डॉ. हेडगेवार चौकात वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने झेब्रा क्रॉसिंगच्या कामास अखेर सुरुवात करण्यात आली आहे.भा ग मोरे कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघ तालुका अध्यक्ष नायगाव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने याची दखल घेत पावले उचलल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भाऊराव मोरे यांनी दि. ८ रोजी नांदेडचे जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून नायगाव येथील डॉ. हेडगेवार चौकात वाढत्या वाहतूक कोंडीसह अपघातांचा धोका लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची भा. ग.मोरे यांनी मागणी केली होती. या निवेदनात चौकात झेब्रा क्रॉसिंग, ट्रॅफिक सिग्नल, लाईट सुरू इंडिकेटर, रंबलिंग स्ट्रिप्स तसेच वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती.

दरम्यान, गेल्या महिन्यात या चौकातील मोठमोठे खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कामे अपेक्षित होती. काही यांत्रिक अडचणींमुळे झेब्रा क्रॉसिंगच्या कामाला विलंब झाला असला, तरी अखेर संबंधित यंत्रणेकडून या कामास प्रारंभ करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

डॉ. हेडगेवार चौक हा नायगाव शहरातील प्रमुख चौक असून, येथून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच व्यापारी वर्गाची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. विशेषतः शाळकरी मुले व ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे या चौकात सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत होती.

ज्येष्ठ नागरिक संघानेही सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या हिताचा प्रश्न प्रशासनापुढे प्रभावीपणे मांडला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत झेब्रा क्रॉसिंगच्या कामास सुरुवात केली आहे. उर्वरित ट्रॅफिक सिग्नल, लाईट इंडिकेटर आणि रंबलिंग स्ट्रिप्स यांसारख्या सुविधाही लवकरात लवकर कार्यान्वित कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

या कामास प्रारंभ झाल्याबद्दल कै. बळवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेशी निगडित प्रश्नांबाबत प्रशासनाने दाखविलेली तत्परता निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वयातूनच लोकहिताची कामे मार्गी लागतात. डॉ. हेडगेवार चौकातील सुरक्षाविषयक उपाययोजनांची ही सुरुवात असून, भविष्यातही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सुविधा उभारण्यात याव्यात, अशी अपेक्षा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल नायगाव शहरासाठी निश्चितच दिलासादायक ठरणार असून, भविष्यात संभाव्य अपघातांना आळा घालण्यास मदत होणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत.

# आईच्या कष्टाला लेकाची साथ; उपजिल्हाधिकारी विलास नरवटे यांनी जपली मातीतील संस्कृती

## आईसोबत दगडी जात्यावर धान्य दळताना दिसला संस्कारांचा वारसा;

लोहा प्रतिनिधी

लोहा उच्च पदावर विराजमान झाल्यानंतर अनेकदा व्यक्ती आपल्या मुळांपासून आणि मातीपासून दूर जात असल्याचे चित्र दिसते. मात्र, याला पूर्णपणे अपवाद ठरले आहेत लोहा-कंधारचे कार्यक्षम उपजिल्हाधिकारी विलास नरवटे. प्रशासकीय कामाचा व्याप आणि जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत असतानाच, आपल्या ६० वर्षीय मातोश्री कलावती बळीराम नरवटे यांना घरगुती कामात मदत करत त्यांनी माणुसकीचे आणि संस्कारांचे दर्शन घडविले आहे. आईसोबत पारंपरिक पद्धतीने दगडी जात्यावर धान्य दळतानाचा त्यांचा साधेपणा सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून लोहा आणि कंधार तालुक्याचे उपजिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून विलास नरवटे यांनी आपल्या कामाचा एक वेगळा 'धडाका' लावला आहे. केवळ कार्यालयात बसून काम न करता, प्रत्यक्ष ग्रामीण भागात जाऊन युवक आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यावर त्यांचा विशेष भर असतो. सर्वसामान्यांच्या समस्या प्राधान्याने ऐकून त्या तातडीने मार्गी लावण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे अल्पावधीतच त्यांनी प्रशासकीय यंत्रणेत आणि लोकांच्या मनात एक विश्वासार्ह अधिकारी म्हणून स्थान निर्माण केले आहे.

प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करत असतानाही, ते आपल्या मुळांशी घट्ट जोडलेले आहेत. सुट्टीच्या दिवशी गावी आल्यावर अधिकारीपदाचा



कोणताही बडेजाव न ठेवता, ते पुन्हा एक जबाबदार 'मुलगा' बनतात. आई कष्ट करत असताना त्यांना एकटे न सोडता, विलास यांनी स्वतः खाली बसून जात्यावर धान्य दळण्यास मदत केली. ही दृश्ये पाहून ग्रामीण संस्कृतीतील मायेचे प्रतिबिंब सर्वांना पाहायला मिळाले.आजच्या धावपळीच्या युगात, जिथे अनेकजण आपल्या संस्कृतीपासून लांब जात आहेत, तिथे एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने आपला साधेपणा जपल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पदाचा अहंकार नसलेला आणि आईवर अफाट प्रेम करणारा मुलगा लाभणे हे आईच्या कष्टाचे फळ आहे, अशा भावना व्यक्त करत आहेत.

आई कलावती बळीराम नरवटे यांनी मुलाला दिलेले संस्कार आणि विलास यांनी ते जोपासलेले हे मूल्य आजच्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. कर्तव्याची धुरा समर्थपणे सांभाळत असतानाच घरच्या संस्कृतीला आणि आईच्या कष्टाला महत्त्व देणारे विलास नरवटे यांचे हे रूप लोहा-कंधारच्या जनतेसाठी अभिमानास्पद ठरले आहे.

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत केज तालुक्यात

# १,६२० क्विंटल सोयाबीन बियाण्यांचे वितरण

केज (प्रतिनिधी)

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेल्या २,८०० शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत १,३५० क्विंटल सोयाबीन बियाण्यांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच पीक प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत २७० क्विंटल सोयाबीन बियाण्यांचे १०० टक्के अनुदानावर वितरण करण्यात आले असून, एकूण १,६२० क्विंटल बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांना ११ जूनपूर्वीच




बियाणे उपलब्ध करून देण्यात आल्याने तालुक्यात पुरेसा पाऊस झाल्यानंतर खरीप पेरणीसाठी शेतकरी सज्ज झाले आहेत. वेळेत बियाणे उपलब्ध झाल्यामुळे पेरणीचे नियोजन सुलभ झाले असून खरीप हंगामाला वेग आला आहे.कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना दर्जेदार उत्पादनासाठी विविध जनजागृती व प्रात्यक्षिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया प्रात्यक्षिके तसेच पेरणीपूर्व तांत्रिक मार्गदर्शनाचा समावेश आहे. यामुळे शेतकऱ्यांना निरोगी पीक उभारणीसाठी मदत होणार असून उत्पादनवाढीस चालना मिळणार आहे.तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने महाबीजचे अधिकृत विक्रेते, कृषी सहाय्यक व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून बियाणे वितरणाचे नियोजन यशस्वीपणे पूर्ण केले आहे. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व कृषी सेवा सातत्याने उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने दिली.

# शंकर बरडे खून प्रकरणात आरोपींना मोठा झटका; पाचही जामीन अर्ज फेटाळले

## ॲड. सुर्यकांत पवार यांच्या दमदार युक्तिवादाने फिर्यादी पक्षाला दिलासा

बीड । प्रतिनिधी

पाडळी येथील भिल्ल समाजातील शंकर यांच्या गाजलेल्या खून प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत पाचही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. या निर्णयामुळे आरोपींना मोठा धक्का बसला असून मृत शंकर यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याच्या आशा अधिक बळकट झाल्या आहेत.

या प्रकरणातील सुनावणीदरम्यान फिर्यादी पक्षाच्या वतीने ॲड.सुर्यकांत पवार यांनी अत्यंत प्रभावी आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम युक्तिवाद सादर केला. गुन्ह्याचे गंभीर स्वरूप, तपासादरम्यान समोर आलेले पुरावे, साक्षीदारांवर दबाव आणला जाण्याची शक्यता तसेच आरोपींना जामीन दिल्यास समाजात चुकीचा संदेश जाऊ शकतो, या सर्व बाबी त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.



ॲड. पवार यांच्या सविस्तर मांडणीची दखल घेत न्यायालयाने आरोपींची बाजू फेटाळत नाना जानू सरवदे,अंकुश गिरजाप्पा अवंतकर, अक्षय राजाभाऊ सरवदे, सोनाजी भिवसेन सरवदे, अशोक(पिनु) सखाराम सरवदे ५ आरोपींची जामीन अर्ज नामंजूर केले. त्यामुळे खून प्रकरणाच्या तपासाला आणि न्यायप्रक्रियेला महत्त्वपूर्ण बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयाचे भिल्ल समाजातून स्वागत करण्यात येत असून परिसरात समाधान व्यक्त केले जात आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने घेतलेली ही कठोर भूमिका न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी असल्याची प्रतिक्रिया कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पाडळी खून प्रकरणाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असताना आलेला हा निर्णय न्यायप्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे फिर्यादी पक्षाच्या वतीने ॲड.सुर्यकांत पवार यांनी अत्यंत प्रभावी आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम युक्तिवाद सादर केला यावेळी ॲड. सुर्यकांत पवार यांना ॲड. शेख इम्रान, ॲड. पंकज रायभोळे, ॲड. शेख अनवर तसेच इबात शेख यांनी सहकार्य केले.